POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614



मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-३०३ ● मुंबई, बुधवार, ०४ जून २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

### महायुती सरकारचा मोठा निर्णय... महाराष्ट्रात नव्या आयोगाची स्थापना?

## कोणासाठी आणि का स्थापन केलाय नाव आयोग?

**■मुंबई। प्रतिनिधी :**

महायुती सरकारने एक मोठाी निर्णय घेताल आहे. महाराष्ट्रात नव्या आयोगाची स्थापना करण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. यावेलई या नव्या आयोगाची घोषणा करण्यात आली. महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोगाची स्थापना करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासनाने अनुसूचित जमातींसाठी स्वतंत्र आयोग स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. ₹महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग₹ असे या आयोगाचे नाव असेल. या आयोगासाठी आवश्यक पदे निर्माण केली जातील. तसेच कार्यालयीन जागा आणि इतर खर्चांना देखील मान्यता देण्यात आली आहे. ''महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग सुद्धा स्वतंत्रपणे कार्यरत राहणार,'' असेही शासनाने स्पष्ट केले आहे.



महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग या नव्या आयोगाच्या स्थापनेसह मंत्रीमडंळ बैठकीत अनेक महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत.
धारावीच्या पुनर्विकासाचा मार्ग आता अधिक सुकर होणरा आहे.
दुग्ध व्यवसाय विकास विभागाच्या कुर्ला येथील 8.5 हेक्टर जमीन धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी देण्यात येणार आहे.
या जमिनीच्या हस्तांतरणासाठी करारामध्ये काही बदल करण्यात आले आहेत.

राज्य कामगार विमा महामंडळ कर्मचाऱ्यांसाठी छत्रपती संभाजीनगरमध्ये २०० खाटांचे रुग्णालय उभारणार आहे. यासाठी मौजे करोडी येथे सहा हेक्टर गायरान जमीन देण्यात आली आहे. याशिवाय पुणे, अहिल्यानगर, सांगली, अमरावती, बल्लारपूर-चंद्रपूर, सिन्नर-नाशिक, बारामती, सातारा आणि पनवेल येथे रुग्णालये उभारण्यासाठी जमिनी देण्यास तत्वतः मान्यता देण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला पथकराच्या सवलतीमुळे होणारे नुकसान भरून मिळणार आहे. मुंबईच्या प्रवेशद्वारावरील पाच टोल नाक्यांवर सवलत देण्यात आली आहे. त्यामुळे टरफ्ळ्ळ ला जो आर्थिक भार येणार आहे, त्याची भरपाई शासन करणार आहे. ''मुंबई प्रवेशद्वाराच्या पाच पथकर स्थानकावर सवलत दिल्यामुळे महामंडळास द्यावी लागणारी भरपाई,'' असे शासनाने म्हटले आहे.

### महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळजनक घडामोड!

## शिंदेंचे सर्व मंत्री आणि एकटे अजित पवार... आता पुढे काय होणार?

**■मुंबई। प्रतिनिधी :**



राज्यात महायुतीचे सरकार सत्तेत आहे. एकनाथ शिंदे यांची शिवसेना, अजित पवार यांची राष्ट्रवादी आणि भाजप असे हे महायुतीचे सरकार आहे. महायुतीमध्ये वादाची ठिणगी पडली आहे. एकनाथ शिंदें यांचे सर्व मंत्री अजित पवारांविरोधात नाराज आहेत. यामुळे एकनाथ शिंदेचे सर्व मंत्री आणि एकटे अजित पवार अशा प्रकारचे चित्र उभे राहिले आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळजनक घडामोड घडली आहे. महायुतीमधील वाद चव्हाट्यावर आला आहे. एकनाथ शिंदेचे सर्व मंत्री अजिदत पवारांवर चिडले आहेत. शिवसेनेच्या सर्व मंत्रांनी एकनाथ शिंदेंकडे तक्रार केली आहे. यामुळे आता एकनाथ शिंदे थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे हा विष्य मांडणार आहेत.

शिवसेनेच्या सर्व मंत्रांनी अजित पवारांविरोधात एकनाथ शिंदेंजवळ तक्रार केल्याची माहिती सूत्रांनी दिलीये.. अजित पवार आमची विकासकामं थांबवत असल्याची तक्रार शिवसेनेच्या मंत्र्यांनी शिंदेंकडे केलीये.. तर देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्याशी बोलून यावर उपाययोजना करणार असल्याचं एकनाथ शिंदें नाराज मंत्र्यांना सांगितल्याची माहिती सूत्रांनी दिलीये.. आज कॅबिनेट बैठकीनंतर शिवसेनेच्या मंत्र्यांची एकनाथ शिंदेंच्या उपस्थितीत बैठक संपन्न झाली. यावेळी शिवसेनेच्या मंत्र्यांनी अजित पवार विकासकामं थांबवत असल्याची तक्रार केल्याची माहिती आहे.. तर सरकारमध्ये सर्वांना समान अधिकारी मिळावा, अशी भावना देखील व्यक्त केली आहे.

यावेळी मंत्र्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे अर्थखाते असल्यानं शिवसेना पक्षाच्या मंत्र्यांच्या विभागांना कमी निधी दिला जात असल्याची तक्रार एकनाथ शिंदेंकडे केली. यापूर्वीही अजित पवारांबद्दलची नाराजी एकनाथ शिंदेंकडे व्यक्त केली होती. महायुती सरकार अंतर्गत कुरघोडीचे राजकारण होत असल्याचे पहायला मिळत असलं तरी ते रोखण्यासाठी आता मुख्यमंत्री काय पाऊले उचलतात ते पहावे लागेल.

## २ तासांत नियंत्रण रेषा कशी ओलांडली?

### सुनीता जमगडेची एनआयए सह काश्मीर पोलिसांकडूनही चौकशी

**■मुंबई। प्रतिनिधी :**

पाकिस्तानात जाण्यासाठी एलओसी ओलांडणाऱ्या नागपुरातील सुनीता जमगडे प्रकरणासंदर्भात एक नवी माहिती समोर आली आहे. भारताची सीमा पार करत पाकिस्तानात गेलेल्या सुनीताची चौकशी करता काश्मीर पोलीस नागपुरात दाखल झाले आहे आहेत. दरम्यान, सुनीता जमगडे या महिलेला काश्मीर पोलीस तपासाकरता काश्मीरला ही घेऊन जाऊ शकतात, अशी देखील शक्यता वर्तवली जात आहे. त्यासाठी कोर्टाच्या आदेशानंतर प्रोडक्शन वॉरंट घेऊन ही कारवाई केली जाणार असल्याचे बोललं जात आहे.



दरम्यान, सुनिताने गुगल मॅपच्या मदतीने एलओसी क्रॉस केल्याचं तपासात उघडकीस आलं आहे. त्यामुळे सुनिता जामगडेचा मोबाईल सध्या तपासण्यात येत आहे. मात्र त्यात मालवेअर असल्याच्या शक्यतेने सायबर टीम काळजीपूर्वक मोबाईलचा तपास करत आहे. या दरम्यान सुनीता दोन लोकांच्या संपर्कात होती. त्यांपैकी एक जुल्फीकार नावाचा व्यक्ती होता.

सुनीता नागपुरातून ४ मे रोजी काश्मीरला फिरायला जात आहे, असं सांगून नागपुरातून घरून निघाली होती. त्यानंतर १४ मे रोजी कारगिल पोलिसांकडून माहिती मिळाली होती की मुलाला सोडून ती पाकिस्तानला गेली. त्यानंतर पाकिस्तान प्रशासनाने तिला बीएसएफकडे सुपूर्द केले. बीएसएफकडून महिलेला ताब्यात घेतल्यानंतर अमृतसर पोलिसांना प्राथमिक चौकशी करण्यात आली. त्यानंतर नागपूरात आणण्यात आले. सध्या या प्रकरणी राष्ट्रीय एजन्सी ही तपास करत आहे.

## देशात ४ दिशांना पावसाची ४ विचित्र रुपं

### महाराष्ट्राला मान्सूनचा चकवा... ईशान्य भारतात पूर अन् भूस्खलनाच्या घटना

**■मुंबई। प्रतिनिधी :**

मान्सूननं घेतलेली मोठी विश्रांती सध्या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या चिंतेत भर टाकताना दिसत आहे. मात्र विदर्भ आणि कोकण इथं अपवाद ठरत असून, या भागांमध्ये अधूनमधून पावसाच्यचा हलक्या सरींची हजेरी पाहायला मिळत आहे. हवामान विभागाच्या निरीक्षणानुसार पावसानं उघडीप देताच राज्यातील तापमानात मोठे चढ- उतार पाहायला मिळत आहेत. दरम्यान, विदर्भात मात्र विजांच्या कडकडाटासह पावसाच्या हजेरीची शक्यता पाहता हवामान विभागानं या भागासाठी यलो अलर्ट जारी केला आहे.





**पुढील २४ तास पावसाचे...**

केंद्रीय हवामानशास्त्र विभागाच्या माहितीनुसार पुढच्या २४ तासांमध्ये सिक्कीम आणि पूर्वोत्तर भारताच्या अनेक भागांमध्ये हलक्या ते मध्यम स्वरुपातील पावसाची शक्यता आहे, तर दक्षिण कोकण, गोवा आणि कर्नाटकच्या किनारपट्टी क्षेत्रासह केरळच्या उत्तरेकडील भागांमध्ये मध्यम स्वरुपातील पावसाची शक्यता आहे. तर, अंदमान आणि निकोबार बेट समुहासह पश्चिम हिमालय क्षेत्रातील काही भागांमध्ये हलक्या पावसाची हजेरी असेल.

विदर्भासह राज्याच्या कोकण आणि मधय महाराष्ट्रात हलक्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. मात्र मान्सून अभावी तापमानाचा कमाल आकडा पुन्हा एकदा 39 अंशांच्या घरात पोहोचला असून, चंद्रपूर इथं राज्यातील सर्वाधिक कमाल तापमानाची नोंद करण्यात आली असून हा आकडा ३९.८ अंशांच्या घरात असल्याचं सांगण्यात येत आहे. तिथं पश्चिम महाराष्ट्रात घाटमाथ्यावर ढगांची दाटी पाहायला मिळेल. मात्र वाऱ्याच्या वेगानं हे ढग बरसण्याऐवजी पुढेच निघून जातील अन् इथं ऊन पावसाचा खेळ तिथं पाहायला मिळतो.

दरम्यान मुंबई शहर आणि उपनगरांमध्ये पुढील २४ तासांमध्ये आकाश अंशतः ढगाळ राहणार असून हलका पाऊस पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. शहराच्या किनारपट्टी भागांमध्ये आर्द्रतेचं प्रमाण अधिक राहील, ज्यामुळं उष्मा अधिक तीव्रतेनं जाणवू शकतो.

**ईशान्य भारतात पूर, भूस्खलन**

ईशान्य भारत पावसानं थैमान घातलं असून, आसाम, अरुणाचल प्रदेश, मणिपूर, त्रिपुरा, मेघालय, सिक्कीम या राज्यांना मुसळधार पावसाचा फटका बसला आहे. मागील चार दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे इथं विविध ठिकाणी पूर आणि भूस्खलनाच्या घटना घडल्या आहेत. आसाममधील अनेक भागांमध्ये पाण्याची पातळी वाढली असून १५ जिल्ह्यांमधील जवळपास चार लाख नागरिक यामुळं प्रभावित झाले आहेत. दरम्यान, राज्यात पुढील २४ तासांमध्ये जवळपास सर्वत्र मध्यम, काही ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पाऊस पडण्याचा आणि तुरळक ठिकाणी अतिवृष्टी होण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

## जामिनावर सुटलेल्या गुंडाकडून कॉंग्रेस नेत्याच्या भावाची हत्या

**■अकोला। प्रतिनिधी :**

अकोला जिल्ह्यातील कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय कौसल यांचे बंधू आणि माजी अभियंता संजय कौसल यांची हत्या करण्यात आली आहे. धक्कादायक बाब म्हणजे जामीनावर बाहेर असलेल्या महेंद्र पवार या आरोपीनं 60 वर्षीय संजय कौसल यांची हत्या केली. संजय कौसल हे सार्वजनिक बांधकाम विभागात अभियंते म्हणून निवृत्त झाले होते. अकोल्यातल्या रणपिसे नगरात हे थरारक हत्याकांड घडलं असून धक्कादायक बाब म्हणजे हा सगळा प्रकार सीसीटीव्हीमध्ये कैद झाला आहे.

गंभीर अवस्थेत असलेल्या पीडित संजय कौशल यांना नागरिकांनी अकोला सर्वोपचार रुग्णालयात भरती केले होते मात्र तेथे डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले..ही संपूर्ण घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे. अद्याप या हत्येचं कारण स्पष्ट झालेलं नाही.



भारतीय राष्ट्रिय कॉंग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते विजय कौसल यांचे लहान भाऊ आणि सार्वजनिक बांधकाम विभागातील सेवानिवृत्त अभियंता 60 वर्षीय संजय कौसल यांची अकोल्यातील रणपिसे नगर परिसरात काल रात्री हत्या करण्यात आली आहे. जुन्या वैमनस्यातून हे हत्याकांड घडल्याची परिसरात चर्चा आहेय..बारा ज्योतिर्लिंग मंदिर जवळ एका अपार्टमेंट जवळ लोखंडी शस्त्राने डोक्यावर प्रहार करून सेवानिवृत्त अभियंता संजय कौसल यांची हत्या करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहिती नुसार हल्लेखोर आरोपी सराईत गुन्हेगार असून एका प्रकरणात तुरुंगात होता. मात्र सध्या तो जामीनावर बाहेर आला होता. सोमवारी सायंकाळी त्याची संजय कौसल यांच्याशी भेट झाली. सुरवातीस त्यांच्यात बोलचाल होवुन जुना वाद उफाळून आलाय आणि आरोपीने संजय कौसल यांच्या छातीवर आणि डोक्यावर धारदार लोखंडी टिकासने गंभीर वार केले..पोलिसांनी आरोपीला अटक केली असून पुढील तपास करीत आहेत.

### आरोग्य विभागात नोकरी लावण्याचं आमिष, ९० जणांकडून उकळले दीड कोटी

## माजी केंद्रीय मंत्र्यांच्या नावाचा वापर केल्याचा संशय

**■नाशिक। प्रतिनिधी :**

आरोग्य विभागात नोकरी मिळवून देण्याच्या आमिषाने तब्बल ९० जणांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणात सुमारे दीड कोटी रुपयांचा आर्थिक अपहार करण्यात आल्याचे समोर आले आहे. फसवणूक करणाऱ्यांनी नाशिक आणि धुळे जिल्ह्यांतील आरोग्य विभागात विविध पदांवर कंत्राटी पद्धतीने नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवले होते. या गंभीर प्रकाराबाबत सरकारवाडा पोलीस ठाण्यात कविता भदाणे आणि वैभव पोळ या दोघांच्या विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींनी भरती प्रक्रियेसाठी माजी केंद्रीय मंत्री सुभाष भामरे यांचे नाव वापरल्याचा संशय आहे. या प्रकरणाची तक्रार कुणाल भदाणे यांनी नोंदवली असून, त्यांच्या तक्रारीनंतर सरकारवाडा पोलीस ठाण्यात संबंधित आरोपींविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या प्रकरणाची अधिक चौकशी सुरू असून, आरोपींनी आणखी किती जणांची फसवणूक केली आहे आणि या प्रकरणात इतर कोणी गुन्ह्यात सामील आहे का? याचा तपास सुरू आहे.





**दीड कोटी रुपयांचा अपहार**

याबाबत सरकारवाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश आव्हाड यांनी म्हटले आहे की, दि. २९ मे २०२५ रोजी कुणाल भदाणे यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कुणाल भदाणे हे साक्री परिसरात डॉक्टर आहेत. त्यांच्या ओळखीच्या अनेक तरुणांनी त्यांची नातेवाईक असलेली कविता भदाणे हिच्याकडे नोकरीला लावण्यासाठी पैसे जमा करून दिले होते. आरोपी महिलेने आरोग्य विभागात सफाई कामगार, ड्रायव्हर, लॅब टेक्निशियन अशा वेगवेगळे पदांमध्ये कंत्राटी पद्धतीने काम करण्याचे कॉन्ट्रॅक्ट त्यांना मिळाले असल्याचे सांगून वेगवेगळ्या लोकांकडून पैसे घेतले. ठराविक मुदत उलटून गेल्यानंतर आरोपींनी काम देखील केले नाही आणि पैसे देण्यासाठी टाळाटाळ केली. यानंतर तरुणांची फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर डॉक्टर कुणाल भदाणे यांनी याबाबत तक्रार दाखल केली आहे. यात किमान ९० लोकांची फसवणूक झाल्याचे उघड झाले आहे. सुमारे दीड कोटी रुपयांचा अपहार करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली आहे.

## एअरपोर्टवर एक बॅग उघडताच त्यात ४७ विषारी साप

**■मुंबई। प्रतिनिधी :**

विमानतळावर तपासणीदरम्यान प्रवाशांकडून सोनं आणि इतर महागड्या वस्तू जप्त केल्या जातात हे आपण अनेकदा ऐकतो आणि पाहतो. परंतु मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर एक विचित्र दृश्य पहायला मिळालं. विमानतळावर सीमाशुल्क तपासणीदरम्यान अधिकाऱ्यांनी एका भारतीय प्रवाशाकडून चक्क 47 विषारी साप आणि पाच कासवं जप्त केली आहेत. प्रवाशाकडे इतक्या मोठ्या संख्येने साप पाहून सुरक्षा कर्मचारीही हादरले. हा प्रवासी थायलंडहून भारतात परतला होता. त्याने बँकॉकहून भारतात येण्यासाठी विमानाने प्रवास केला होता. याप्रकरणी त्याला पोलिसांनी अटक केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर एका भारतीय प्रवाशाकडे ४७ विषारी साप आणि पाच कासवं आढळून आली. अधिकाऱ्यांना संबंधित प्रवाशाबद्दल संशय आला होता.



त्यानंतर त्यांनी त्याला थांबवलं आणि त्याच्या बॅगेची तपासणी केली. या तपासणीदरम्यान त्यांना विषारी साप आणि कासवं आढळून आली. RAW (रेस्क्विंक असोसिएशन फॉर वाइल्ड लाइफ वेलफेअर) पथकाने या साप आणि कासवांच्या प्रजाती ओळखण्यास मदत केल्याचंही अधिकाऱ्यांनी सांगितलं. हे साप आणि कासव वन्यजीव संरक्षण कायद्यांतर्गत पुन्हा त्या देशात परत पाठवले जातील. याप्रकरणी प्रवाशाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याच्यावर योग्य ती कारवाई केली जात आहे.

### मायलेकी प्लॅटफॉर्मवर ओरडत राहिल्या पण घरचा करता जगात नव्हता...

## बायकोशी भांडण आणि पुढच्या क्षणात...

**■मुंबई। प्रतिनिधी :**

राग हा माणसाचा सर्वात मोठा शत्रू आहे. राग तणाव वाढवतो आणि आलेला राग क्षणात काय करेल हे सांगता येत नाही. याचे एक उदाहरण रविवारी १ जून रोजी गोंदियातील आमगाव रेल्वे स्थानकावर पाहायला मिळाले. जिथे रागाच्या एका ठिणगीने आनंदी कौटुंबिक जीवन उद्ध्वस्त झाले.

**पती-पत्नीमध्ये भांडण**

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, तुलसीदास हे विदिशा येथे शिक्षक म्हणून काम करायचे. रविवारी ते आपली पत्नी आणि मुलीसह आमगावला लागून असलेल्या मध्य प्रदेश राज्यातील करंजा गावात चालले होते. तेथे ते एका कौटुंबिक कार्यक्रमात सहभागी झाले. समारंभ संपल्यानंतर ते रविवारी संध्याकाळी ६ वाजताच्या सुमारास घरी परतायला निघाले. पत्नी आणि मुलीसह आमगाव स्टेशनवर पोहोचले आणि पुढे जे झालं ते धक्कादायक होतं.





**काय आहे संपूर्ण प्रकरण?**

गोंदिया जिल्ह्यातील आमगाव रेल्वे स्थानकावर पत्नीशी झालेल्या भांडणानंतर व्यवसायाने शिक्षक असलेल्या पतीने एक भयानक पाऊल उचलले. त्याने अचानक प्लॅटफॉर्मवर येणाऱ्या छत्तीसगड एक्सप्रेसच्या इंजिनसमोर उडी मारली. ज्यामुळे तो ट्रेनला धडकला आणि त्याचा तात्काळ मृत्यू झाला. तुलसीदास पराते असे मृत इसमाचे नाव असून ते ३५ वर्षांचे होते. हे कुटुंब मध्य प्रदेशातील विदिशा जिल्ह्यात राहते.

**ट्रेनची वाट पाहत असताना झाला वाद**

पराते कुटुंब छत्तीसगड एक्सप्रेसची वाट पाहत असताना पती-पत्नीत भांडण झाले. रागामुळे दोघांमधील तणाव वाढतच गेला. यामुळे संतापलेल्या पतीने एक भयानक पाऊल उचलले आणि क्षणार्धात होत्याचे नव्हते झाले. प्लॅटफॉर्मवर येणाऱ्या छत्तीसगड एक्सप्रेस ट्रेनच्या इंजिनसमोर त्यांनी उडी मारून आत्महत्या केली.

**मृतदेहाचे दोन तुकडे**

तुलसीदास पराते यांनी ट्रेनखाली उडी मारली आणि मायलेकींनी एकच आक्रोश केला. या घटनेनंतर पत्नी आणि मुलीच्या ओरडण्याचा आवाज ऐकून लोकांची गर्दी जमली. रेल्वे ट्रॅकवर पडलेला मृतदेह दोन भागांमध्ये विभागला गेला होता. माहिती मिळताच आमगाव रेल्वे पोलीस घटनास्थळी पोहोचले.

ही ट्रेन बिलासपूरहून गोंदिया मार्गे अमृतसरला जात होती. पराते कुटुंबाला याच ट्रेनने प्रवास करायचा होता पण नशिबात काहीतरी वेगळेच होते. घटनास्थळ पंचनाम्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी आमगाव रुग्णालयात पाठवण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली. याप्रकरणी पोलिसांनी अपघाती मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास सुरु आहे.



## मुंबईत सेक्ससाठी नकारावरुन पती-पत्नीत वाद... तिने अंगावर रॉकेल ओतून घेतलं... पतीने असं काही केलं की...

**■मुंबई। प्रतिनिधी :**

मुंबईत एक धक्कादायक घटना घडली आहे. ४६ वर्षांच्या व्यक्तीने पत्नीलाच पेटवून देण्याचा प्रयत्न केला आहे. शुक्रवारी दुपारी ही घटना घडली आहे. पोलिसांनी या प्रकरणी आरोपीला अटक केली आहे. पत्नीसोबत झालेल्या भांडणातून हा प्रकार घडल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. दिनेश आव्हाड असं आरोपीचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चेंबूर येथील रहिवासी असलेल्या दिनेश आव्हाड यांचे त्यांच्या पत्नीसोबत वाद झाले. दिनेश याला पत्नीसोबत शारिरक संबंध ठेवायचे होते. मात्र महिलेने यासाठी त्याला नकार दिला. कामावर जायला उशीर होतोय असं सांगून महिलेने त्याला नकार दिला. यावरुन दोघांमध्ये वाद झाले. नंतर वादाचे रुपांतर मोठ्या वादात झाले. या वादातून पत्नीने तिच्या अंगावर रॉकेल ओतून घेतले पण माचिसची काडी पेटवली नव्हती, मात्र याच संधीचा फायदा घेत पतीने गॅस स्टोव्हमधून कागदाचा तुकडा पेटवला आणि तो तिच्यावर फेकला. ज्यामुळे तिच्या कपड्यांना आग लागली.

शुक्रवारी दुपारी ही घटना घडली, आगीने पेट घेतल्यानंतर गंभीर अवस्थेत महिला रुग्णालयात पोहोचली. महिला गंभीर जखमी आहे. महिलेच्या तक्रारीनुसार पोलिसांनी आव्हाडला अटक केली आहे. हत्येचा प्रयत्न या गुन्ह्याखाली महिलेला अटक करण्यात आली आहे. याबाबत अद्याप तपास सुरू आहे. महिला ही मदतनीस असून इतरांच्या घरी कामासाठी जाते. कामाला जायला उशीर होत असल्याने तिने नवऱ्याला नकार दिला त्याचाच राग मनात ठेवून त्याने पत्नीला पेटवले.

**अनैतिक संबंधाला विरोध केला म्हणून खून**

अनैतिक संबंधाला विरोध केला म्हणून पेस्टीसाईडचं इंजेक्शन देऊन पत्नीचा निर्घृणपणे खून करणाऱ्या पतीसह पाच जणांना पश्चिम देवगड पोलिसांनी अटक केली आहे. धुळे शहरातील वलवाडीतील सैन्य दलात कार्यरत असलेल्या कपिल बागुल याने आपली पत्नी शारदा बागुल हिचा तिला बळजबरीने पेस्टिसाइडचे इंजेक्शन देऊन तिचा खून केला.



# संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

## हुंडा न घेण्याचा कोकणी पॅटर्न

वैष्णवी हगवणे हिचा हुंड्यामुळे बळी गेल्यानंतर उभा महाराष्ट्र ढवळून निघाला असून विशेषतः महिला वर्गातून संतापाची लाट उसळलेली आहे. काहींचे तर असे म्हणणे आहे की, सासर आणि माहेरच्यांची प्रतिष्ठा जपण्यासाठी तसेच काही वेळा जीवाला असलेल्या भीतीमुळे महिला बोलत नाही, हुंड्यामुळे सासरच्यांकडून होणारा छळ निमुटपणे सोसत राहतात. वैष्णवी हगवणे ही हाय प्रोफाईल केस असल्यामुळे त्याविषयी जास्त चर्चा झाली, पण अशा किती तरी वैष्णवी आज हुंड्यामुळे बळी जात आहेत. वैष्णवी हे हिमनगाचे टोक आहे. लग्नात मुलाच्या घरच्यांकडून घेतला जाणारा हुंडा ही फार गुंतागुंतीची आणि समाजाच्या मानसिकतेत खोलवर रुजलेली समस्या आहे. ती उखडून काढणे अवघड आहे, पण ती शस्त्रक्रिया करण्याची गरज आहे. खरे तर हुंडाविरोधी कायदा होऊन अनेक वर्षे झाली आहेत, पण त्याची अंमलबजावणी किती होते हा प्रश्न आहे. अगदी छोटे उदाहरण पहा. रिक्षा आणि टॅक्सी चालवणाऱ्यांना जे लायसन्स मिळालेले असते, त्यानुसार प्रवासी तिथे सांगेल तिथे त्याने जाणे अपेक्षित आहे. अनेक वेळा प्रवाशांना असा अनुभव येतो की, रिक्षा आणि टॅक्सीवाले त्यांच्या सोयीनुसार भाडे स्वीकारतात. जर ते प्रवाशाला भाडे नाकारत असतील तर त्यांच्या गाडीचा क्रमांक पाठवून पोलिसांकडे विशिष्ट क्रमांकावर तक्रार केली तर त्या भाडे नाकारणाऱ्यावर कारवाई केली जाते, पण अशी तक्रार करणाऱ्यांची संख्या अगदी नगण्य असते. उलट, त्या रिक्षा किंवा टॅक्सीवाल्याला बाबापुता करून त्याला प्रसंगी जास्त पैसे देऊन माणसे आपल्या इच्छितस्थळी पोहोचतात. असेच हुंड्यासाठी छळ होणाऱ्यांकडून केल्या जाणाऱ्या तक्रारींचे असते. बहुतेक ठिकाणी महिला किंवा तिच्या माहेरची मंडळी हुंड्यासाठी सासरच्यांकडून छळ होत असूनही त्याविरोधात पोलिसात तक्रार करत नाहीत. त्यांना चुचकारत राहतात. पुढे तो छळ वाढत जातो आणि त्याचा उद्रेक होऊन त्यात महिलेचा बळी जातो. वैष्णवी हगवणे हिच्या सासरची मंडळी श्रीमंत होती, तर मग त्यांनी तिच्या वडिलांकडून इतका ऐवज कशासाठी घेतला, असा सामान्य माणसांना प्रश्न पडतो, पण मुलीच्या माहेरच्यांकडून जणू काही आपला हक्क आहे, असे समजून भरपूर हुंडा उकळणे ही अनेकांची मानसिकता आहे. तुमची मुलीची बाजू आहे, म्हणजे दुय्यम बाजू आहे, आम्ही तुमच्यापेक्षा वरचढ आहोत, तुमची मुलगी आमच्या घरी देणार आहात, त्यामुळे आमच्या मागण्या तुम्हाला पूर्ण करायच्या आहेत, या वर्चस्ववादी मानसिकतेतून हुंडा प्रथा बोकाळलेली आहे. तशी हुंडा प्रथा ही भारतात सगळीकडे आहे, पण महाराष्ट्राचा विचार केला तर कोकणाचा अपवाद केला तर इतर भागात या प्रथेचा पगडा खूप मोठा आहे. कोकणात लग्नात दोन्ही बाजू त्यांच्या कुवतीप्रमाणे समान खर्च करतात. हुंडा हा प्रकार तिथे नसतो. तसेच लग्न झाल्यानंतर वर्षभर प्रत्येक सणाला मुलीकडून जावयाला काही द्यायचे असते, तेही ऐच्छिक असते, त्यासाठी सासरच्यांकडून दबाव किंवा पिळवणूक केली जात नाही. हुंड्याचा संबंध हा शेतकरी आत्महत्येशी निगडित आहे. शेतकरी आत्महत्येची कारण शोधण्यात आलेली आहेत, त्यात हुंडा देणे हे एक प्रमुख कारण आहे. कारण शेतीसाठी जे कर्ज घेतले जाते, त्यातील बराच पैसा हा मुलीच्या लग्नातील खर्च आणि जावयाला हुंडा देण्यासाठी खर्च केला जातो. स्त्रीभ्रूण हत्या यातूनच होत असतात. कारण मुलगी जन्माला आली तर जावयाला मोठा हुंडा द्यावा लागतो, त्यामुळे तिला गर्भातच मारले जाते. कोकणात हुंडा हा प्रकार नसल्यामुळे तिथला शेतकरी आत्महत्या करत नाही आणि तिथे स्त्रीभ्रूणहत्याही होत नाही. वैष्णवीच्या मृत्यूनंतर खासदार सुप्रिया सुळे यांनी राज्यभरात हुंडाविरोधी मोहीम उघडण्याचे घोषित केले आहे, पण यापूर्वीही 'मुलगी वाचवा, मुलगी शिकवा', हे अभियान त्यांनी राबवले आहे. त्यावेळी अनेक मुली त्यांना आम्हाला हुंडा न घेणारा मुलगा आणून द्या, असे सांगत असत. त्यावेळी सुप्रिया सुळे म्हणत, मला सगळ्या महाराष्ट्रात कोकणी पॅटर्न राबवायचा आहे. कारण तिथे हुंडा दिला, घेतला जात नाही, लग्नात अवाढव्य खर्च केला जात नाही, शेतकरी आत्महत्या करत नाहीत, स्त्रीभ्रूणहत्या नाही, ऑनर किलिंग नाही, मुलींची छेडछाड नाही. सुप्रियाताईंना इतक्या वर्षांत तसा प्रचार करून ते शक्य झालेले नाही, कारण तशी मानसिकता निर्माण करणे फार अवघड असते. हुंडा देणे, घेणे हे केवळ मराठा समाजात चालते असे नाही, पण मराठा समाजात हे प्रमाण जास्त आहे, कारण बरेच मराठा लोक सत्ताधीश असतात, कारखानदार असतात. त्यामुळे लग्नात मोठा खर्च करतात आणि हुंडाही मोठा दिला, घेतला जातो. खरे तर हा सगळा खर्च म्हणजे शक्तिप्रदर्शनाचा प्रकार असतो. पण त्या ओढाताणीत मुलीकडच्या लोकांची पिळवणूक होते. प्रसंगी कर्ज काढावे लागते. अशा खर्चिक लग्नांचे अनुकरण इतर समाजातील लोक करतात, हुंडाही दिला, घेतला जातो. वैष्णवी हगवणेचा हुंड्यामुळे मृत्यू झाल्यानंतर अहिल्यानगर येथील मराठा समाजाने एकत्र येऊन यापुढे मुलींचा हुंड्यासाठी बळी जाऊ नये, मुलीकडच्यांची लूट होऊ नये, यासाठी आचारसंहिता जारी केली आहे. हुंडा नको, कर्ज काढून लग्न नको, प्री-वेडिंग बंद करा असे अनेक नियम करण्यात आले आहेत. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे स्मरण करून या आचारसंहितेचे पालन व्हावे हीच अपेक्षा.

## जनतेचा वाली कोण?

**जनतेच्या समस्यांचे निवारण करणारे लोकप्रतिनिधी असले, तरी सध्याचे राजकारण जनतेसाठी कमी आणि राजकारण्यांसाठी अधिक आहे. निवडणुकीच्या वेळी राजकारणी 'जनतेचे कैवारी' असले, तरी एकदा निवडून आल्यानंतर ते लोकांच्या समस्यांकडे दुर्लक्ष करतात. राजकारणाच्या पॅटर्नमध्ये बदल झाला आहे, ज्यामुळे सामान्य जनतेचे प्रश्न आणि मूलभूत सुविधा दुर्लक्षिल्या जात आहेत. महायुती सरकारने सत्तेत आल्यानंतर जनतेला काय दिले, हाच मोठा प्रश्न आहे.**

लोकप्रतिनिधी म्हटले की, आपल्या प्रभागातील समस्यांचे निवारण करणारा हक्काचा व्यक्ती. त्यामुळे मतदारराजा आपल्या मर्जीतील लोकप्रतिनिधीला निवडतो. मुबलक पाणी, दर्जेदार आरोग्य सुविधा, शिक्षण या मूलभूत गोष्टींची सर्वसामान्य जनतेची माफक अपेक्षा; मात्र गेल्या काही वर्षांत राजकारणाचा पॅटर्न बदललाय आणि राजकारण फक्त राजकारण्यांच्या अवतीभोवती घिरट्या घालत आहे. आरोप-प्रत्यारोपनंतर सगळं शांत, मात्र यात भरडला जातो तो सर्वसामान्य माणूस. भ्रष्टाचाराची ओरड करणारे राजकारणी आणि भ्रष्टाचाराच्या आरोपावर पडदा टाकणारेही तेच, त्यामुळे जनतेचा वाली कोण? याचे उत्तर लोकप्रतिनिधींनाच देऊ शकते.



निवडणुका जवळ आल्या की, 'जनतेचे आम्हीच कैवारी' असा टेंबा सर्वच राजकीय पक्षांकडून मिरवला जातो. त्यात यंदाचे वर्ष हे निवडणुकीचे; महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत, ग्रामपंचायत या निवडणुका पुढील चार ते पाच महिन्यांत पार पडणार आहेत. मात्र या निवडणुकीत संपूर्ण देशाचे लक्ष लागते ते मुंबई महापालिकेकडे. त्यामुळे घोषणांचा पाऊस, उद्घाटनांचा सपाटा, आरोप-प्रत्यारोप हे सगळे होणे अपेक्षित आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जवळ येतील तसतसे आरोप-प्रत्यारोपांच्या फैरींना धार येईल. महायुती असो वा महाविकास आघाडीचे नेते, एकमेकांची उणीदुणी काढण्यात धन्यता मानतात. मात्र जनतेचे प्रश्न जैसे थे कायम राहणार, यात दुमत नाही. यंदा वरुणराजाचे वेळेआधीच आगमन झाले. मुसळधार पावसामुळे शेतीचे नुकसान झाले, घरांत पाणी शिरले, यामुळे शेतकरी, सर्वसामान्य माणसाचे गणित बिघडले आहे.

२४ ते २७ मेदरम्यान बरसलेल्या पावसात शेतपिकांचे नुकसान झाले असून, शेतकरी हवालदिल झाला आहे. पुढील दोन महिने पाऊस बरसणार असून, यंदा पाऊस सरासरीपेक्षा अधिक बरसणार, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. त्यामुळे पावसाच्या आड राजकारणाला ऊत येणार आणि आरोप-प्रत्यारोपात जनताच भरडली जाणार, यात दुमत नाही.

राजकारण आणि भ्रष्टाचार हे समीकरण तसे नवीन नाही. 'वाहत्या पाण्यात हात धुवून घ्या' अशी ओळख काही भ्रष्ट अधिकारी व राजकारण्यांची. राजकारणी म्हणजे दुसऱ्या देशातून आलेला व्यक्ती नव्हे, तर तुम्ही-आम्ही निवडून दिलेला हक्काचा लोकप्रतिनिधी. अगदी ग्रामपंचायत ते दिल्लीतील खासदार, तुमच्या-आमच्या मतांवर निवडून आलेले लोकप्रतिनिधी. मतदारराजाच्या समस्यांचे निवारण करणे ही माफक अपेक्षा लोकप्रतिनिधींविषयी असते. निवडणुका जवळ आल्या की, हा लोकप्रतिनिधी आपला हक्काचा आहे, या विश्वासावर तुम्ही-आम्ही मतदान करतो; मात्र एकदा का आपला विश्वासू उमेदवार निवडून आला की, समाजकारण दूर राहून राजकारणात गुंतला जातो. मतदारराजाने निवडून दिले म्हणून इथपर्यंत पोहोचलो, याचा विसर लोकप्रतिनिधींना पडत असावा आणि जनतेच्या प्रश्नांना बगल दिली जाते. ज्यांच्या मतांवर राजकीय प्रवासाची सुरुवात होते, त्याच मतदारराजाचा वाली कोण, असा प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे.

'२० टक्के राजकारण आणि ८० टक्के समाजकारण' हे वाक्य आता बदलत आहे. सध्याचे राजकारण हे जनतेसाठी कमी आणि स्वतःसाठी अधिक असे सुरू आहे. एखाद्या पक्षाने तिकीट नाकारले, पक्षात समाधानकारक पद मिळाले नाही, तर थेट दुसऱ्या पक्षात उडी मारायची आणि मनासारखे करून घ्यायचे, असा राजकारणाचा पॅटर्न बदलत चाललाय. मतदारराजाने दिलेल्या मतालाही शून्य किंमत दिली जाते. महायुती असो वा महाविकास आघाडी किंवा अन्य पक्षांचे नेते, राजकारण हे अर्थपूर्ण राजकारणाच्या दिशेने सुरू असून, जनतेच्या प्रश्नांना केराची टोपली दाखवली जाते. मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या नावाखाली राजकारण सुरू आहे. राजकारणात सर्वसामान्य जनतेच्या नशिबी खड्डेभर रस्ते, पिण्याच्या पाण्यासाठी वणवण, आरोग्य सेवा व्हेंटिलेटरवर- या सगळ्याला कारणीभूत सध्या सुरू असलेले राजकारण. 'खुर्चीसाठी काय पण' असा कारभार सुरू असून जनतेच्या जीवाशी खेळ असे सध्याचे राजकारण सुरू आहे, असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

**जनतेला काय मिळाले!**

राज्यात महायुतीचे सरकार सत्तेत आल्यापासून 'मविआ विरुद्ध महायुती' असा सामना रंगत आहे. पिण्याचे पाणी, दर्जेदार आरोग्य सुविधा, टिकाऊ व मजबूत रस्ते आदी मूलभूत सुविधा मिळणे, या राज्यातील जनतेच्या माफक अपेक्षा; मात्र महायुती सरकार सत्तेत आल्यापासून गेल्या सहा महिन्यांत जनतेला काय दिले, याचे उत्तर राज्यातील जनताच देऊ शकेल. सत्तेत कोणीही असो, ज्यांच्या मतांवर निवडून आला त्यांचे आपण काहीतरी देणे लागतो, याचा विचार आता तरी सर्वपक्षीय नेत्यांनी करणे गरजेचे आहे.

## ग्राहक हो... स्मार्टर व्हा



**सध्याच्या डिजिटल युगात ग्राहक सेवा देणाऱ्या एआय प्रणाली वाढत असल्या तरी ग्राहकांच्या अडचणी वाढत आहेत. चॅटबॉट्स, अलेक्सा यांसारख्या स्मार्ट उपकरणांमुळे सेवेचा अनुभव अवघड झाला आहे. तांत्रिक अडचणी, सेवा रद्द न होणे, चुकीच्या ऑर्डर्स यामुळे ग्राहक त्रस्त होतात. त्यामुळे स्मार्ट उपकरणांचा योग्य उपयोग करण्यासाठी ग्राहकांनीही अधिक सजग, सावध आणि 'स्मार्टर' व्हायला हवे.**

अंदाजे दोन-तीन वर्षांपूर्वी विनोदी अंगाने ग्राहक समस्या मांडणारा एक संवाद समाजमाध्यमांवर फिरत होता. शंभरऐवजी चुकून दहा हजार लाडूंची मागणी नोंदवली गेली होती. कारण काय, तर नवीन फोनमधील शून्य आकडा जास्त वेळ दाबला गेला आणि म्हणून शून्यांची संख्या वाढली. पुढची समस्या अशी की, ही मागणी दुरुस्त किंवा रद्द करण्याची काहीच सोय सापडत नव्हती, कारण ती नव्हतीच! मग काय, चतुर ग्राहकाने पुढे पत्ता-बित्ता दिलाच नाही. पत्ता विचारायला फोन आलाच, चक्क दहा हजार लाडू होते ना! त्यावेळी, ''आम्ही सहा भाऊ आहोत, मी तर ही मागणी नोंदवलीच नाही. मी पाच नंबरचा भाऊ आहे, तुम्ही उरलेल्या बंधुराजांशी संपर्क करा. मोठ्या भावासाठी एक दाबा...'' असे उत्तर पत्ता विचारणाऱ्या माणसाला दिले.

यातील विनोदाचा भाग वगळला, तर आज परिस्थिती आणखीच बिकट होत आहे. ग्राहक सेवा देणारे तंत्रज्ञान पुरवणाऱ्या कंपन्या मेवा खात आहेत आणि ग्राहक? चॅटबॉट, एआय बॉट यांच्या नावाने बोटे मोडण्यापलीकडे काही करू शकत नाहीयेत. ठराविक प्रश्न किंवा समस्या यासाठी या एआय सेवकांकडे माहिती भरून ठेवलेली असते. अनेक सेवा पुरवठादार व्हॉट्सॲपद्वारे ही सेवा देतात. काही उत्पादक /पुरवठादार/बँकांच्या ॲप/ संकेतस्थळावरून कुठलेतरी नाव धारण करणारी सेविका आपल्या चौकशींना उत्तरे देते. पण 'मी हे उत्तर देऊ शकत नाही', असे उत्तर तिला देता येत नाही. ती परत परत आपल्यालाच 'प्रश्न नीट विचार', असे सांगत राहते. ज्या प्रश्नांची/तक्रारीची उत्तरे त्या सेविकेस देणे शक्य नाही, त्यासाठी 'आमच्या ग्राहक तक्रार अधिकाऱ्याशी संपर्क करायला नऊ/शून्य दाबा', अशी सोय तिथे नसते.

या बाबतीतला एक अनुभव - आजकाल डीटीएच सेवा घेणारे ग्राहक सहसा ज्येष्ठ नागरिक असतात. या सेवेत बदल करण्यासाठी, त्याचेही शुल्क भरण्यासाठी व्हॉट्सॲप खाते असते. एका काकूंनी महत्प्रयासाने या ॲपद्वारे एक महिन्यासाठी नेटफ्लिक्स कसे घ्यायचे ते शोधून काढले आणि ह्ययेसह्ह म्हणून ते घेतले. काहीतरी नवीन शिकून काहीतरी वेगळे करुन बघूया, याचा आनंद अर्थातच मोठा होता. आता त्या नेटफ्लिक्सचे लॉग इन बनवणे, पासवर्ड बनवणे याच्याशी झटापट सुरू झाली. त्यांनी अनेक प्रयत्न करून ते साधले नाही. कुणाला विचारले, तर जे सांगितले ते कसे करायचे हेही उलगडेना. आता त्या परत ॲप उघडून जे सगळे केले ते 'अनडू' करण्याचा प्रयत्न करू लागल्या. सुदैवाने मानवी आवाजाशी संपर्क झाला. पण 'आम्ही काही करू शकत नाही, तुम्ही नेटफ्लिक्सशी संपर्क करा', याच्या पलीकडे उत्तर मिळाले नाही.

काकूंचा मुद्दा असा होता की, मी डीटीएच कंपनीची ग्राहक आहे. माझे पैसे तुमच्या कंपनीने स्वीकारलेत, तर मला तुम्ही मदत केली पाहिजे. पण 'ते शक्य नाही', असेच सांगितले गेले. 'मला ही सेवा रद्द करायची आहे. ती कशी करायची?' याचे उत्तर कुठेच सापडेना. अखेरीस थेट डीटीएचच्या ग्राहक सेवा अधिकाऱ्याचा ई-मेल पत्ता मिळवून, पुढच्या महिन्याचे पैसे कापले जाण्याआधी त्यांनी आपली नेटफ्लिक्सची मागणी रद्द करून घेतली. एक महिन्याचे पैसे वाया गेले.

ऑनलाइन खरेदीबाबत गोष्ट अशी की, ज्यावेळी पैसे भरायचे असतात, त्यावेळी ही ॲप्स् अगदी सुरळीत चालतात. मात्र परतावा पुढच्या खरेदीसाठी स्वतःकडेच ठेवून घेतात. मुळात सेवा घेण्यासाठी/ खरेदी करण्यासाठी ग्राहकाला अगणित ॲप्स्, त्यांचे पासवर्ड असे सगळे सांभाळावे लागते. वेळोवेळी पासवर्ड बदलावे लागतात. अर्थात हे ग्राहकाच्या सुरक्षिततेसाठी असते. पण त्यासाठी जी माहिती मागितली जाते, ती कितपत खासगी राहते याविषयी शंका राहतेच.

या संदर्भात सिरी आणि अलेक्सा हे मदतनीस इतके तत्पर असतात की, त्यांना कसे आवरावे याचा धांडोळा घेताना वापरकर्ता थकतो, वैतागतो, हतबल होतो. 'माझं काय चुकलं?' असा विचार करत राहतो. भारतातील ॲमेझॉन अलेक्साला इंग्रजीबरोबर हिंदी आणि 'हिंग्लिश' पण समजते. म्हणजे 'अलेक्सा गीझर चालू करो', 'लाईट डिम करो', 'म्युझिक शुरू करो सात बजे' इत्यादी आज्ञेप्रमाणे ती बिनबोभाट, वेळेवर काम करते. स्मार्ट उपकरणे आणि स्मार्ट अलेक्सा यांच्या संयोगाने स्मार्ट होम आकाराला येतात. इंटरनेटवर शोधायला गेल्यावर हे 'एआय चालित' सेवेकरी काय काय करतात ते समजून आश्चर्य, कौतुक आणि थोडीशी भीती वाटायला लागते. म्हणजे, स्मार्ट उपकरणे वापरताना आपण, वापरकर्त्या ग्राहकाने, स्मार्टर व्हायला हवे. परदेशातील ग्राहकांना येणारे अनुभव आणि त्यानंतरची निस्तरपट्टी करताना होणारा त्रास याची उदाहरणे समजली की, 'इतके स्मार्ट आपण होऊ शकू का?' असा प्रश्न पडू शकतो.

हे एक उदाहरण पहा. एका घरात भले मोठे डॉल्स हाउस आणि त्यासोबत केक असे सामान येऊन पोहोचले. घरातील कुणीही ऑर्डर दिलेली नव्हती. मग? घरातील लहान मूल काहीतरी बडबड करत होते, त्यावेळी अलेक्सा सजग होती. त्या बडबडीचा अर्थ तिला जो समजला, त्यानुसार तिने ऑर्डर दिली सुद्धा. सेवेसी तत्पर! तो भला मोठा खोका दारात येईपर्यंत घरच्या मोठ्यांना पत्ताच नाही. हुज्जत कुणाशी घालायची? आणि जर परत करायची असेल, तर ती वस्तू परत कशी करायची - यासाठी ग्राहक हवा स्मार्टर. आणि हो, समजा तुम्ही म्युझिक सुरू करायची वेळ चुकीची दिलीत आणि घर बंद करून बाहेरगावी गेलात, तरी त्या बंद घरात ते संगीत वाजत राहील. कारण काम सांगणाऱ्याने चूक केली आहे. बंद कधी करायचे तेही सांगितलेले नाही, अलेक्साला ते कसे कळणार? समजून घ्यायला ती हाडामासाची व्यक्ती थोडीच आहे?

**तात्पर्य :** स्मार्ट उपकरणे वापरायची, तर ग्राहक हो - स्मार्टर व्हा!

## छोट्या न्यायालयांची प्रतिष्ठा वाढवणारा मोठा निर्णय!

घटनाकारांनी राज्यघटनेतील तरतुदींचे रक्षण करण्याची जबाबदारी न्यायालयांवर सोपविली आहे. या उतरंडीमध्ये उच्च न्यायालयानंतर येतात जिल्हा व सत्र न्यायालये आणि त्यानंतर येतात न्यायदंडाधिकारी यांची न्यायालये. न्यायव्यवस्थेच्या उतरंडीमध्ये ही न्यायालये खालच्या स्तरावर असल्याने त्यांना बरेचवेळा 'लोअर कोर्ट' असे म्हटले जाते. या न्यायालयांना 'लोअर कोर्ट' म्हणण्यावरच न्या. अभय ओक आणि न्या. ऑगस्टिन जॉर्ज मसिह यांनी आक्षेप घेतला. यापुढे या न्यायालयांना 'लोअर कोर्ट' नव्हे; तर 'ट्रायल कोर्ट'च म्हटले जावे, असे आदेशच त्यांनी एका खटल्याच्या निकालपत्रात दिले आहेत.



न्या. अभय ओक अगदी काही दिवसांपूर्वी सर्वोच्च न्यायालयातून निवृत्त झाले. आपल्या विविध निकालांमधून त्यांनी राज्यघटनेतील तत्त्वांची राखण करण्याचे काम कायमच केले. सत्तार्धायांकडून सत्ता वापरली जाताना नागरिकांना मिळालेल्या मूलभूत अधिकारांवर अतिक्रमण होणार नाही, याची काळजी त्यांनी कायमच घेतली. त्यांच्या निवृत्तीनंतर अनेक माध्यमांनी त्यांच्याबद्दल लिहिले आहे. याच न्या. अभय ओक यांनी आपल्या शेवटच्या दिवशी दिलेल्या काही निकालांमध्ये एक महत्त्वाचा निर्णय घेतला. त्याबद्दल फारशी चर्चा घडली नसली, तरी तो निर्णय देशातील न्यायव्यवस्थेच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आहे.

आपल्या न्यायव्यवस्थेमध्ये उतरंड आहे. ज्यामध्ये सर्वोच्च न्यायालय सर्वोच्च स्थानी आहे. त्यानंतर विविध राज्यांमध्ये उच्च न्यायालये आहेत. सर्वोच्च आणि उच्च ही दोन्ही न्यायालये घटनात्मक न्यायालये आहेत. म्हणजे काय तर या दोन्ही न्यायालयांबद्दल देशाच्या राज्यघटनेमध्येच तरतुदी करण्यात आल्या आहेत. थेट राज्यघटनेमध्येच तरतुदी असल्याने या न्यायालयांना मिळणारे अधिकार आणि तेथील न्यायाधीशांचे स्वातंत्र्य हे कायमच अबाधित राहते. संसदेला किंवा सरकारला या न्यायालयांमध्ये हस्तक्षेप करण्याचा फारसा अधिकार नाही.

घटनाकारांनी राज्यघटनेतील तरतुदींचे रक्षण करण्याची जबाबदारी याच न्यायालयांवर सोपविली आहे. या उतरंडीमध्ये उच्च न्यायालयानंतर येतात जिल्हा व सत्र न्यायालये आणि त्यानंतर येतात न्यायदंडाधिकारी यांची न्यायालये. न्यायव्यवस्थेच्या उतरंडीमध्ये ही न्यायालये खालच्या स्तरावर असल्याने त्यांना बरेचवेळा 'लोअर कोर्ट' असे म्हटले जाते. या न्यायालयांना 'लोअर कोर्ट' म्हणण्यावरच न्या. अभय ओक आणि न्या. ऑगस्टिन जॉर्ज मसिह यांनी आक्षेप घेतला. यापुढे या न्यायालयांना 'लोअर कोर्ट' नव्हे; तर 'ट्रायल कोर्ट'च म्हटले जावे, असे आदेशच त्यांनी एका खटल्याच्या निकालपत्रात दिले आहेत.

शेखावत विरुद्ध उत्तर प्रदेश सरकार या खटल्याचे निकालपत्र न्या. अभय ओक यांनी लिहिले आहे. या निकालपत्राच्या २५ व्या परिच्छेदात न्या. अभय ओक यांनी म्हटले आहे की, कोणत्याही न्यायालयाला 'लोअर कोर्ट' म्हणणे हे राज्यघटनेने आखून दिलेल्या तत्त्वांच्या विरोधात आहे. त्यामुळेच त्यांना 'ट्रायल कोर्ट' म्हटले जावे.

कनिष्ठ स्तरावरील न्यायालयांना 'लोअर कोर्ट' म्हणून संबोधले जाऊ नये, हे याआधीही न्यायाधीशांनी म्हटले होते. पण काही उच्च न्यायालयांकडूनच त्याची अंमलबजावणी केली जात नव्हती. न्या. अभय ओक यांनी या खटल्यामध्ये हाच मुद्दा पुन्हा एकदा उपस्थित करून त्याची सांगड राज्यघटनेतील तत्त्वांशी घातली, हे जास्त महत्त्वाचे आहे.

सर्वोच्च आणि उच्च न्यायालये ही जरी घटनात्मक न्यायालये असली, तरी कोणताही सामान्य नागरिक त्याचे प्रश्न किंवा तंटा घेऊन सर्वात आधी जिल्हा स्तरावरील न्यायालयातच जात असतो. जर विषय मालमत्तेसंदभार्तील असेल, तर दिवाणी न्यायालयात आणि गुन्हेगारीविषयक असेल तर सत्र न्यायालयात हे विषय नेले जातात. न्याय देण्याच्या प्रक्रियेत या न्यायालयांचे महत्त्व कधीही नाकारता येणार नाही.

कारण कोणत्याही खटल्यांमध्ये साक्षीदारांची साक्ष घेणे, उलट तपासणी करणे, खटल्यातील तथ्ये तपासून पाहणे, कायद्यातील तरतुदींचा वापर करणे ही सर्व कामे याच न्यायालयांमध्ये प्रामुख्याने केली जातात. आजही लाखो लोक मोठ्या विश्वासाने या न्यायालयांकडे जातात. तेथील प्रक्रियेचा वापर करून आपल्याला न्याय मिळेल, यासाठी प्रयत्नशील असतात. या सगळ्या स्थितीमध्ये या न्यायालयांना 'लोअर कोर्ट' म्हणून त्यांचे महत्त्व कमी करणे हे स्वीकारण्याजोगे नाही. न्या. अभय ओक यांनी दिलेल्या निर्णयातून हेच दिसून येते.

जेव्हा आपण कोणत्याही न्यायालयाला 'लोअर कोर्ट' म्हणतो, त्यावेळी त्याबद्दल नकळतपणे शंकाही उपस्थित करीत असतो. होते असे की आपली मानसिकता हीच मुळी 'साहेब' या शब्दाभोवती गुंफलेली आहे. ते 'मोठे साहेब' आहेत, असे कोणाला सांगितले की कोणीही भारावून जातो. या मानसिकतेमुळे जे कनिष्ठ स्तरावर काम करणारे आहेत, त्यांच्याबद्दल फारसा कोणाला आदर नसतो. याच मानसिकतेतून 'लोअर कोर्टा'ने दिलेल्या निकालांबद्दल काहीवेळा शंका उपस्थित होते आणि मग खटल्याचा निकाल विरोधात गेलेले पक्षकार वरिष्ठ न्यायालयात किंवा उच्च न्यायालयात अपील करतात.

उच्च न्यायालयात जाणे गैर नाही, पण कनिष्ठ न्यायालयाबद्दल अविश्वास निर्माण होईल किंवा त्यांच्या न्याय देण्याच्या पद्धतीवर शंका उपस्थित होईल, असे वर्तन निश्चितच आक्षेपार्ह आहे. त्यासाठीच 'लोअर कोर्ट'ऐवजी 'ट्रायल कोर्ट' हाच शब्द अधिक सुसंगत असतो. जिथे कोणत्याही प्रकरणाची प्राथमिक सुनावणी होते. म्हणजे ट्रायल होते, ते न्यायालय म्हणजेच 'ट्रायल कोर्ट'.

आता विषय येतो की केवळ 'ट्रायल कोर्ट' म्हटल्याने फार मोठा फरक पडेल का?, केवळ शब्दात बदल केल्याने रचनेमध्ये फार फरक पडणार नाही. पण कोणतेही शब्द हे मोठं काम करीत असतात. संवादामध्ये शब्दांच्या माध्यमातून भावना, विचार यांचे आदानप्रदान होत असते. न्यायव्यवस्थेच्या उतरंडीमध्ये सर्वोच्च स्थानी असलेले न्यायालय जेव्हा एखादा निर्णय देते, त्यावेळी त्याचे गांभीर्यही अधोरेखित होत असते. कारण न्या. अभय ओक यांनी दिलेल्या या निर्णयातून हेसुद्धा दिसून येते की सर्वोच्च न्यायालय सुप्रीम असले, तरी कोणतेही न्यायालय 'लोअर कोर्ट' नाही.

प्रत्येक न्यायालयाची न्यायकक्षा ही आधीच निश्चित करण्यात आली आहे. जसे की प्रत्येक पोलीस ठाण्याशी एक प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी जोडलेला असतो. संबंधित पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडणाऱ्या गुन्ह्यांसंदर्भातील खटले हे त्याच न्यायदंडाधिकाऱ्यांकडे चालविले जातात. जर गुन्हा गंभीर असेल आणि त्याची शिक्षा सात वर्षांपेक्षा जास्त असेल, तर हे प्रकरण न्यायदंडाधिकार्यांकडून सत्र न्यायालयाकडे वर्ग केले जाते. दिवाणी न्यायालयांमध्येही कनिष्ठ स्तर आणि वरिष्ठ स्तर असे दोन प्रकार असतात.

खटला ज्या मालमत्तेसंदर्भात आहे, त्याचे मूल्यांकन काय, यानुसार संबंधित खटला कोणत्या न्यायालयात चालणार हे निश्चित होत असते. देशातील एकूण न्यायव्यवस्थेच्या रचनेचा भाग म्हणून या पद्धतीने विविध न्यायालये अस्तित्त्वात आलेली आहेत. त्यांपैकी कोणतेही न्यायालय 'लोअर कोर्ट' कधीच नव्हते आणि असणारही नाही. मग असे असताना या न्यायालयांना सर्वोच्च आणि उच्च न्यायालयांकडून 'लोअर कोर्ट' म्हटले जाण्याची अजिबात गरज नाही. कारण न्यायदानाचे काम या स्वरुपाच्या न्यायालयाकडून त्यांना आखून दिलेल्या चौकटीच्या आधारेच केले जाते. म्हणूनच त्यांना 'ट्रायल कोर्ट' म्हणणे अधिक संयुक्तिक आहे.

वास्तविक ८ फेब्रुवारी २०२४ मध्येच सर्वोच्च न्यायालयाने 'लोअर कोर्ट रेकॉर्डस' ऐवजी 'ट्रायल कोर्ट रेकॉर्ड्स' म्हटले जावे, असे निर्देश दिले होते. न्या. अभय ओक यांनी आपल्या ताज्या निर्णयातून पुन्हा एकदा सर्वोच्च न्यायालयाच्या नोंदणी विभागाला त्याकडे लक्ष वेधायला लावले. कधी कधी काही गोष्टी लगेच बदलत नाहीत.

कारण त्याची सवयच खूप जास्त असते. पण म्हणून जे बदल घडवून आणायचे आहेत, त्याचा पाठपुरावा सोडून द्यायचा नसतो. सातत्याने त्याबद्दल बोलले गेले की आपसूक सगळेच बदल स्वीकारायला लागतात. सर्वोच्च न्यायालयाने एका खटल्यामध्ये पुन्हा एकदा अधोरेखित केलेला हा निर्णय त्यासाठीच महत्त्वाचा आहे.

आधी म्हटल्याप्रमाणे न्या. अभय ओक यांनी मुंबई, कर्नाटक उच्च न्यायालये आणि सर्वोच्च न्यायालयातील आपल्या कार्यकाळात राज्यघटनेतील महत्त्वाची तत्त्वे सरकारी दडपशाहीपुढे हवी तशी वाकविली जाऊ नयेत, यासाठी महत्त्वाचे निकाल दिले आहेत. त्याच दृष्टीने बघायला गेल्यास हा निर्णय जरी छोटा असला, तरी त्याचा परिणाम भारतीय न्यायव्यवस्थेच्या दृष्टीने मोठा आहे आणि म्हणूनच तो महत्त्वाचा आहे.

# बो-टाय पास्ता सॅलड

**साहित्य :** १ वाटी बो-टाय पास्ता (टायचा बो अर्थात गाठीप्रमाणे आकार असलेला पास्ता), १०० ग्रॅम बोनलेस चिकन, ३ ब्रेड स्लाइस, ४-५ लसूण पाकळ्या, ५० ग्रॅम ऑलिव्ह तेल, १०० ग्रॅम प्रोसेस्ड चीझ, २ अंड्यांचे पिवळे बलक, मीठ चवीनुसार, ८-१० लेट्युसची पाने, हवे असल्यास चिली फ्लेक्स.



**कृती :** सगळ्यात आधी पास्ता मिठाच्या उकळत्या पाण्यातून उकडून घ्या. बो-टाय पास्ता मिळाला नाही किंवा आवडत नसेल तर मॅक्रोनी किंवा तुमच्या आवडीचा पास्ता घेता येईल. पास्ता उकडल्यावर लगेचच पाण्याखाली गार करा आणि थोडं तेल लावून फ्रीजमध्ये ठेवा. लसणीचे बारीक बारीक तुकडे करून घ्या. चिकनला मीठ, मिरपूड लावून पॅनमध्ये थोड्याशा ऑलिव्ह तेलात शिजवून घ्या. ब्रेड स्लाइसचे छोटे छोटे चौकोनी तुकडे करून ते पॅनमध्ये भाजून घ्या. यात थोडंसं तेल आणि लसूण घालून त्याला छान लसणीचा स्वाद येऊ द्या. चीझ किसून ठेवा. अंड्याचे पिवळे बलक चांगले लुसलुशीत होईपर्यंत फेटून घ्या. त्यात चीझ घाला आणि थोडंसं ऑलिव्ह तेल घाला. मिश्रण फेटून घ्या.

एका बाऊलमध्ये लेट्युसची पाने, पास्ता, चिकन आणि ब्रेडचे तुकडे एकत्र टॉस करा. त्यावर बनवलेले चीझ आणि अंड्याचे ड्रेसिंग वाढा. आता हे सॅलड थंड करून पेश करा.

# फेस स्क्रब डोळ्यांच्या पापण्यांवर वापरणे योग्य आहे का?

**जर तुम्ही वारंवार मेकअप करीत असाल तर शक्य असेल तेव्हा मेकअप करणे टाळा. प्रत्येकवेळी मेकअप केल्यावर तो एखाद्या चांगल्या क्लिनझरने काढून टाका. ब्युटी एक्स्पर्ट आश्मीन मुंजल यांच्याकडून जाणून घेऊयात**

**संपूर्ण** चेहऱ्यात डोळे हा फार नाजूक अवयव आहे. त्यात डोळ्यांच्या पापण्या हा तर अति संवेदनशील भाग आहे. त्यामुळे निरोगी राहण्यासाठी व सौंदर्य टिकवण्यासाठी त्यांची डोळ्यांची योग्य निगा राखणे फार गरजेचे आहे. जर तुम्ही वारंवार मेकअप करीत असाल तर शक्य असेल तेव्हा मेकअप करणे टाळा. प्रत्येक वेळी मेकअप केल्यावर तो एखाद्या चांगल्या क्लिनझरने काढून टाका. ब्युटी एक्स्पर्ट आश्मीन मुंजल यांच्याकडून जाणून घेऊयात डोळ्यांच्या पापण्यांची निगा कशी राखावी.



सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे डोळ्यांच्या पापण्यांवर कधीही स्क्रब वापरू नका. कारण तुमच्या पापण्यांवरील अतिसंवेदनशील त्वचा व पापण्यांवरील केस यावर अति सौंदर्यप्रसाधनांचा वापर केल्यामुळे त्यांचे नुकसान होऊ शकते. खरं तर पापण्यांना फार स्वच्छतेची गरज नसते व पापण्यांवर फेस स्क्रब तर मुळीच वापरू नयेत.



तसेच चेहऱ्यासाठी वापरण्यात येणारे फेस स्क्रब डोळ्यांच्या पापण्यांसाठी योग्य नसतात. कारण ते पापण्यांच्या त्वचेसाठी त्रासदायक ठरू शकतात. मात्र जर तुमच्या भुवयांच्या केसांमध्ये कोंडा असणे किंवा तुम्हाला पापण्यांजवळील त्वचा कोरडी असण्याची समस्या असेल तर तुम्ही अगदी सौम्य स्क्रब वापरू शकता. यासाठी अति दाणेदार अथवा खरखरीत नसलेले एखादे सौम्य ॲप्रिकॉट स्क्रब तुम्ही घेऊ शकता. या स्क्रबचा काही भाग घ्या व त्यामध्ये थोडे मॉश्चरायझर मिसळून तुम्ही त्याचा हलक्या हाताने तुमच्या पापण्यांवर मसाज करू शकता. हा मसाज करताना एक गोष्ट नेहमी लक्षात ठेवा हा मसाज क्लॉकवाइज करावा.

जर तुमच्या पापण्यांवरील केस पातळ व कमजोर असतील तर मात्र तुमच्या डोळ्यांच्या आजूबाजूला कोणतेही सौंदर्यप्रसाधने वापरू नका. जर तुमच्या पापण्यांवरील केस दाट असतील व तुम्हाला कोरड्या त्वचेची समस्या असेल तर तुम्ही वर दिलेले मिश्रण वापरू शकता. डोळ्यांच्या पापण्यांवर कोरफडाचे जेल अथवा मास्क वापरणे योग्य ठरेल.

# सकाळची न्याहारी किती आवश्यक आहे!

**सकाळची** न्याहारी शरीरासाठी किती आवश्यक आहे, हे सर्वजण जाणत असूनही अनेक लोक सकाळच्या नाश्त्याकडे दुर्लक्ष करून घराबाहेर पडतात. त्याचे दुष्परिणाम मग त्यांच्या शरीरावर होतात.

सकाळचा नाश्ता निरोगी राहण्यासाठी फार महत्त्वाचा आहे. नाश्ता शरीरात ऊर्जा निर्माण करतो. नाश्ता करणारे लोक नाश्ता न करणाऱ्या लोकांपेक्षा अधिक धडधाकट असतात. सकाळी उठल्यानंतर एक तासात नाश्ता करायला हवा. नाश्ता केल्याने मेंदूला चालना मिळते व एकाग्रता वाढायलाही मदत होते. शाळा-कॉलेजांत जाणारी बरीचशी मुले जी नाश्ता करत नाही, त्यांचे लक्ष अभ्यासात केंद्रित होत नाही. पण समतोल नाश्ता घेतला तर अनेक आजारांपासून आपला बचाव होऊ शकतो.



सकाळच्या नाश्त्यात प्रथिने, खनिज, व्हिटॅमिन, फायबर, कार्बोहायड्रेट इत्यादी घटकांचा समावेश करा. नाश्त्यामध्ये भाज्या, फळं, दूध, मोड आलेले कडधान्य, पनीर, दही, सालीच्या डाळी इत्यादींचा समावेश करा. तसेच संमिश्र भाज्या मिळवलेले पोहे, ओट्स, उपमा, दालिया, चिलाल चपाती, इडली, उकडलेले अंडे इत्यादी घेऊ शकता.

सकाळचा नाश्ता केल्यास हृदयरोग, अल्सर, मधुमेह, लठ्ठपणा यासारख्या आजारापासून बचाव होऊ शकतो.

# आपल्याला होते फूड ॲलर्जी, तर हे करा

**जेव्हाही** आपले शरीर खाण्याप्रती अधिक क्रियाशील होते तेव्हा फूड ॲलर्जीची तक्रार होऊ शकते. अशात काही प्रोटीनयुक्त आहारदेखील आपल्या शरीराला नुकसान करू शकतात कारण काही लोकांची प्रतिकारशक्ती काही पदार्थांना प्रतिसाद देऊ शकत नाही आणि त्याचे दुष्परिणाम म्हणून ॲलर्जी दिसून येते. मुख्यतः लोकांना मैदा, सोया, अंडी, मासे, शेंगदाणे, काही विशिष्ट मसाले किंवा एखाद्या तेलाच्या प्रकारची ॲलर्जी असते. कधी कधी ॲलर्जी टेस्ट मध्येही ॲलर्जी नेमकी कसली आहे हे कळून येत नाही. अशात ते आपल्यालाच शोधून काढायला हवे. एकदा ॲलर्जी कोणत्या पदार्थाची आहे समजल्यावर पथ्ये पाळणे आवश्यक असतं.

**सामान्यतः ॲलर्जीची ही लक्षणे असतात**

- खाज सुटणे
- अतिसार
- डोळे, ओठ आणि चेहऱ्यावर सूज येणे
- श्वास घ्यायला त्रास होणे
- हृदयाच्या ठोक्यांची गती वाढणे

**यापासून वाचण्यासाठी**

- जर आपल्या खाण्यामुळे त्रास होत असेल तर खाण्याशी संबंधित सर्व धान्य टाळावे.
- बाहेर आहार घेताना विशेष काळजी घ्यावी.

# लंचनंतर अजिबात नका करू हे काम

**ब्रश करणे :** लंचनंतर ब्रश करणे योग्य नाही. कारण आपण सिट्रस असलेला आहार घेतला असल्यास ब्रश केल्याने दातांवरील ती परत निघून जाते ज्याला इनेमल असे म्हणतात.



**अधिक पाणी पिणे :** आपण जेवल्यानंतर अधिक मात्रेत पाणी पित असल्यास पाचक प्रणालीवर याचा गंभीर प्रभाव होतो. यामुळे अनेक रोग उद्भवण्याची शक्यता असते. खरं म्हणजे जेवताना आणि जेवण झाल्यावर लगेच पाणी पिणे विष समजले जाते. जेवण झाल्यावर कमीत कमी अर्धा किंवा तासाभरानंतर पाणी पिणे योग्य आहे.

**फिरणे :** काय आपण ही लंच घेतल्यानंतर फेऱ्या मारता? पण ही एक हानीकारक सवय आहे जी लगेच थांबवायला हवी. तज्ज्ञांप्रमाणे आमची पाचक प्रणाली इतकी मजबूत आहे की लंचमध्ये आपण कितीही अटरम- शटरम खाल्लं असेल तरी सर्वकाही पचून जातं. या दरम्यान आमची प्रणाली आहाराला पचवून सर्व आवश्यक पोषण आम्हाला ऊर्जेच्या रूपात देतं. पण आमचे हे सिस्टम जरा संवेदनशील असल्यामुळे तेव्हा त्याला आपले कार्य सुरळीतरीत्या पार पडण्यात अडथळा निर्माण होतो जेव्हा आपण त्याला यातना देतात. म्हणून दुपारी लंच केल्यानंतर फिरणे किंवा काही हेवी कार्य करण्याऐवजी १५ ते २० मिनिटे आराम करण्याचा सल्ला दिला जातो.

**ड्रायव्हिंग :** जेवण पचवण्यासाठी अधिक रक्ताची गरज असते, ज्यासाठी मेंदू मदत करतं. परंतु जेवल्यानंतर आपण ड्रायव्हिंग करत असाल तर मेंदू त्यावर आपलं लक्ष केंद्रित करतो आणि जेवण पचवण्यात त्याची मदत मिळत नाही.

**झोपणे :** लंचनंतर लगेच झोपल्याने पचन संबंधी रोग होऊ शकतात. याने आपल्या गॅससंबंधी समस्याही उद्भवू शकते.

# फोनचे ब्लूटूथ नेहमी ऑन असते?

## मिनिटात होऊ शकते डिव्हाइस हॅक, असे राहा सेफ

जर तुम्ही तुमच्या फोनमध्ये नेहमी ब्लूटूथ चालू ठेवत असाल तर, सावध व्हा. कारण, यामुळे तुमचा फोन हॅक देखील होऊ शकतो. जाणून घेऊया याबद्दल सविस्तर. ब्लूटूथ सर्व फोनमध्ये असते आणि बरेच लोक ते सतत वापरतात सुद्धा. स्मार्टफोन, टॅबलेट आणि लॅपटॉपमध्ये ब्लूटूथ आधीच दिलेले आहे. एका डिव्हाइसवरून दुसऱ्या डिव्हाइसमध्ये फाइल ट्रान्सफर करण्यासाठी ब्लूटूथची आवश्यकता असते. पण तुम्हाला माहीत आहे का ? डिव्हाइसमध्ये असलेले ब्लूटूथ जितके सोयीस्कर आहे तितकेच ते धोकादायकसुद्धा असू शकते. हॅकर्स ब्लूटूथद्वारे तुमचे डिव्हाइस हॅक करू शकतात. त्याला ब्लूबगिंग असेही म्हणतात. ब्लूटूथ हॅकिंग कसे केले जाते आणि त्यापासून तुम्ही कसे सुरक्षित राहू शकता, याबद्दल ही महत्त्वाची माहिती.

**ब्लूटूथ हॅकिंग कसे काम करते?**



हॅकर्स एक विशिष्ट सॉफ्टवेअर वापरतात, जे आपोआप ब्लूटूथने सुसज्ज असलेली उपकरणे शोधतात. हॅकर्स हेदेखील पाहू शकतात की, तुमचे डिव्हाइस आधी कोणत्या नेटवर्कशी कनेक्ट केले गेले आहे. फोन आधीपासून कनेक्ट केलेले नेटवर्क पुरेसे विश्वासार्ह मानतो आणि भविष्यात त्यांच्याशी आपोआप कनेक्ट होतो. सायबर गुन्हेगारांना तुमच्या डिव्हाइसचे विश्वसनीय नेटवर्क माहीत असल्यास, ते त्याद्वारे तुमच्या डिव्हाइसशी कनेक्ट होतात. यानंतर तुमचे डिव्हाइस हॅक होते. त्यानंतर हॅकर्स डिव्हाइसमध्ये मालवेअर इन्स्टॉल करतात. याद्वारे हॅकर्स तुमची हेरगिरी करतात. तुमचे मेसेजेस वाचतात आणि डेटा देखील चोरू शकतात.

**यापासून सुरक्षित कसे राहायचे?**

डिव्हाइस वापरात नसताना ब्लूटूथ डिसेबल करा. तुम्हाला फाइल्स ट्रान्सफर करायच्या असतील तर, तुम्ही एयर ड्रॉप किंवा फास्ट शेयर वापरू शकता. ब्लूटूथ सेवांची प्रवेशक्षमता मर्यादित करा. हे ब्लूबगिंग टाळते. तुमच्या स्मार्टफोन, टॅबलेट आणि ब्लूटूथ सक्षम संगणकांवर तुमच्याकडे ॲंटीमालवेअर ॲप स्थापित असल्याची खात्री करा. एखाद्या हॅकरने तुमच्या डिव्हाइसमध्ये शिरण्याचा प्रयत्न केल्यास, ॲंटी-मालवेअर ॲप तुमची गोपनीयता आणि वैयक्तिक डेटा संरक्षित करताना संशयास्पद ॲक्टीव्हीटीज शोधू आणि ब्लॉक करू शकतो.



# पाण्यात पाय बुडवून ठेवण्याचे फायदे

**मॉलमध्ये** किंवा मार्केटमध्ये फिरायला तर सर्वांना आवडतं, पण तिथून आल्यावर जो थकवा येतो त्याने अगदी काही काम नको नकोसं वाटतं. पण असा थकवा आपण काही वेळातच दूर करू शकता. त्यासाठी हे करा

- एका टबमध्ये कोमट पाण्यात थोडंसं मीठ घालून आपले दोन्ही पाय बुडवा. याने थकवा दूर होतो आणि चालताना सूज आली असल्यास त्यावरही राहत मिळते.
- ज्या लोकांना रात्री झोप न येण्याची तक्रार असते त्यांनी हा प्रयोग नक्की अमलात आणावा. झोपण्यापूर्वी कोमट पाण्यात १५ ते २० मिनिटे पाय बुडून ठेवावे.
- याने रक्तप्रवाह सुरळीत होतो.
- जे लोक रात्रभर एकाच कुशीवर झोपतात, त्याने सकाळी उठून हा प्रयोग करावा. याने दिवसभर फ्रेश जाणवेल.
- या प्रयोगाने किडनीची एनर्जी वाढते.
- संधिवाताची तक्रार असलेल्या लोकांनी पाण्यात दालचिनी आणि काळे मिरे टाकून पाय पाण्यात ठेवावे.
- हा प्रयोग जेवण झाल्यावर करणे योग्य ठरेल.
- लो ब्लड प्रेशरची तक्रार असलेल्यांनी गरम पाण्यात पाय ठेवून बसू नये. मधुमेही रुग्णांनी पण हा प्रयोग करू नये.

# टॅटू काढून टाकण्यापूर्वी या गोष्टींकडे अवश्य लक्ष द्या!

**उत्साहाच्या भरात अनेकदा अंगावर वेगवेगळ्या ठिकाणी टॅटू काढले जातात. काहीजण आपल्या साथीदाराचे नाव टॅटूमध्ये बनवतात. पण कालांतराने नात्यात दुरावा आल्यानंतर तेच नाव नकोसे वाटते. अशावेळेस टॅटू काढून टाकण्यासाठी नेमके काय करावे? ही प्रक्रिया त्रासदायक असते का? याबाबतचा खास सल्ला डर्मेटोलॉजिस्ट डॉ. के. खतुजा यांनी दिला आहे.**



**टॅटू क्रीम परिणामकारक नसतात**

टॅटू निघून जाण्यासाठी क्रीम्स किंवा बाम यांचा वापर करण फायदेशीर नाही. कोणत्याच घरगुती उपायांनी किंवा क्रीम लावल्याने टॅटूपासून सुटका मिळत नाही.

**लाल किंवा पिवळ्या रंगाचे टॅटू कायमचे जाणे कठीण आहे**

प्रत्येक रंग शोषून घेण्यासाठी काही विशिष्ट वेव्हलेंग्थ काम करतात. त्यामुळे एकाच वेव्हलेंग्थमुळे सारेच रंग जाणे कठीण असते. अनेकजण काळे आणि निळे घालवणारे लेझर वापरतात. त्याचाच वापर करून लाल किंवा पिवळा रंग जाणे मुश्कील आहे.

**लेझर त्रासदायक ठरत नाहीत**

लेझर ट्रीटमेंटपूर्वी त्वचेवर काही सोल्युशन लावून तेथील भागातील संवेदनशीलता कमी केली जाते. त्यामुळे काही सेकंद तुम्हाला त्रास जाणवतो. लेझर किरणांमुळे वातावरणातील उष्णता अधिक वाढते. म्हणूनच उपचारांदरम्यान आयवेअर दिली जातात. म्हणजे तुम्हाला काहीच दिसत नाही.

**हात, पाय, घोट्यावरील टॅटू काढणे कठीण आहे**

लोअर बॅकच्या भागापेक्षा बोटाच्या सांध्याजवळील टॅटू काढणे कठीण असते. शरीरात रक्तवाहिन्यांजवळील भागातील टॅटू काढणे अधिक सुकर आहे. पाय, घोटा किंवा हात या भागावरील टॅटू काढणे कठीण आहे.

**अनेक लेझर सेशन्स लागतात**

टॅटू पूर्णपणे काढून टाकण्यासाठी सुमारे १०-१५ सेशन्स लागतात. त्वचेला पुन्हा पूर्ववत होण्यासाठीदेखील वेळ द्यावा लागतो.

**टॅटूच्या खुणा राहतात**

टॅटू पूर्णपणे काढला तरीही त्याच्या थोड्याफार खुणा राहतात. टॅटू काढला तरीही तो कोणत्या भागावर होता हे तुमचे मित्र नक्कीच ओळखू शकतात.

**लेझर ट्रीटमेंटदरम्यान बर्निंग स्मेल येतो**

टॅटू काढताना तुम्हाला काही जाणवत नसले तरीही वास येतो. यादरम्यान त्वचेवर लेझरची किरणे जेव्हा त्वचेत जातात तेव्हा laser plume घटक वातावरणात मिसळल्यानंतर बर्निंग स्मेल येतो.

**काही काळ दुर्गंधीचा त्रास होईल**

स्कार/डाग पडू नये, त्वचा पूर्ववत व्हावी याकरिता काही जेलचा वापर करा. पण ॲन्स्थेशियाचा प्रभाव जसा कमी होतो तसा काही दिवस त्रास जाणवतो.

# चेहऱ्यावर पुन्हा त्याच जागी पिंपल का येतो?

**पिंपलचा** त्रास टाळण्यासाठी घरगुती उपाय, उत्तम फेसवॉश वापरणे यासारखे सारे खटाटोप करता. परंतु, अनेकांमध्ये विशिष्ट काळानंतर पुन्हा त्याच जागी पिंपल येण्याची समस्या आढळून येते. पिंपल्सचे चेहऱ्यावर त्याच त्याच जागी पुन्हा येणे यामागील नेमके काय याबद्दलचा खास सल्ला डर्मेटोलॉजिस्ट डॉ. सेजल शहा यांनी दिला आहे. त्वचेच्या खाली वाढणारे पिंपल्स अनेकदा त्वचेवर दिसत नाहीत. त्वचेवरील छिद्रांमधून जेव्हा तेल बाहेर पडण्याची प्रक्रिया वाढते तेव्हा सूजही वाढते. त्वचेच्या खाली तेलामुळे गोलाकार फुगवटा निर्माण होतो. त्याचे प्रमाण तेलावर अवलंबून असते. तसेच तुम्हाला सतत चेहऱ्याला हात लावण्याची सवय असेल तर पुन्हा त्याच जागी ॲक्ने वाढण्याचा धोका अधिक असतो. सतत चेहऱ्याला हात लावण्याच्या सवयीमुळे चेहऱ्यावरील मळ, तेल पुन्हा छिद्रांमध्ये ढकलला जातो. यामुळे पिंपल्सची वाढ अधिक प्रमाणात होते.



**पिंपलचा त्रास कमी करण्यासाठी काय कराल ?**

पिंपलमध्ये पस निर्माण झालेला असल्यास त्याला फोडण्याचा मोह टाळा. त्याला सतत हात लावू नका. ते आपोआपच कमी होण्यासाठी थोडा वेळ द्या. किंवा डर्मेटोलॉजिस्टचा सल्ला घ्या. अनेकदा पिंपल फोडल्यानंतरही त्यातील सारा पांढरा भाग/पस बाहेर पडत नाही. त्यामुळे पुन्हा त्याजागी पिंपल वाढण्याची शक्यता निर्माण होते. म्हणूनच चेहरा पूर्णपणे स्वच्छ करण्यासाठी salicylic acid युक्त फेसवॉशचा वापर करा. यामुळे अतिरिक्त तेल काढण्यास मदत होते. benzoyl peroxide चा समावेश असलेल्या उत्पादनांची निवड केल्यास त्वचेवर वाढणारे आणि ॲक्नेच्या निर्मितीला कारणीभूत ठरणाऱ्या बॅक्टेरियांचा प्रभाव कमी करण्यास मदत होते.

# चमकदार दातांसाठी

## झोपण्याच्या वेळेस करा ही कामे

- नारळाचे तेल ऑरगॅनिक आणि नॅच्युरल टीथ व्हाईटनर आहे. नारळाच्या तेलाने तुम्ही तुमचे दात चमकवू शकता. यासाठी थोडेसे नारळाचे तेल घेऊन १५ मिनिटे तोंडात ठेवा. त्यानंतर साध्या पाण्याने चूळ भरा. यामुळे फायदा होईल.
- दात चमकवण्यासाठी सोपा उपाय म्हणजे स्ट्रॉबेरीज. स्ट्रॉबेरीच्या गरात चिमूटभर बेकिंग सोडा मिसळा. हे मिश्रण ब्रशवर घेऊन दात घासा. यामुळे दातांवरील पिवळेपणा दूर होईल.



- ॲपल सिडर व्हिनेगरही दात चमकावण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. याचे काही थेंब दातांवर चोळा. अधिक फायद्यासाठी सकाळी ब्रश करण्याआधी या व्हिनेगरने दात चोळा.

# किरकोळ आजारांकडे दुर्लक्ष नको

**आपल्या दैनंदिन जीवनमानात अगदी किरकोळ आजार हे कधीकधी दुर्लक्षिले जातात, मात्र त्याचा त्रास जाणवू लागला की त्यानंतर डॉक्टरकडे धाव घेतली जाते. मात्र अगदी किरकोळ वाटणारे दुखणे हे एखाद्या आजाराचे कारण आहे असे समजले की मग मनात भीती निर्माण होते. शिवाय त्या आजाराचे गंभीर परिणाम आयुष्याची चिंता, खर्च आदी गोष्टींचे टेन्शन निर्माण होऊन मग वेळीच इलाज केला असता, तर बरे झाले असते असे वाटून जाते. यावेळी अगदी किरकोळ म्हणून वाटणारे दुखणे हे एखाद्या गंभीर आजाराचे लक्षण आहे, असे वाटले तर त्यावर वेळीच इलाजही केला जाऊ शकतो.**

**पित्त :** आपल्याला नियमित काही खाल्ले तर त्याचा त्रास होतो. खाल्लेले पचत नाही, किंवा भूकच लागत नाही. छातीत जळजळ, तेलकट किंवा दुपारच्या जेवणाव्यतिरिक्तही काही खाल्ले तरी ते पचत नाही, म्हणून मग ते किरकोळ पित्तावर ढकलले जाते. पण मग त्याचा अति त्रास झाला की, मग डॉक्टरकडे जाण्यावाचून पर्याय उरत नाही. पित्तामुळे काही खाणे होत नाही. यामुळे एकप्रकारची त्रस्तता दिसून येते. मात्र यावर वेळीच इलाज न केल्यास याचा परिणाम पित्ताचे खडे होणे आदीसारख्या समस्या निर्माण होण्याकडे दिसून येतो. मग पित्ताचे खडे काढण्यासाठी ऑपरेशन केली जातात.



**पोटदुखी :** पोटदुखीसारख्या वारंवार उद्भवणाऱ्या आजाराकडे बरेचदा दुर्लक्ष केले जाते. काही घरगुती उपाय करून किंवा अशा दुखण्यांकडे दुर्लक्ष करून ती किरकोळ म्हणून त्याकडे दुर्लक्ष केले जाते. मात्र मासिक पाळीच्या वेळी पोटात दुखणे, किंवा इतरवेळी वारंवार पोटात दुखणे हे नेहमीचेच म्हणूनही त्याकडे फारसे लक्ष दिले जात नाही. एका उदाहरणामध्ये एका महिलेच्या वारंवार पोटात दुखण्याच्या तक्रारीमुळे काही घरगुती इलाज केल्यानंतरही काही गुण नाही म्हणून मग डॉक्टरी उपाय करण्याचे ठरले. स्टोनमुळे पोटात दुखत असावे असा अंदाज करून डॉक्टरनेही त्यावरील औषधे सुरू केली. काही पथ्ये सांगून औषधांना खर्चदेखील झाला. मात्र, तरीदेखील हे दुखणे सुरूच राहिल्याने शेवटी तज्ज्ञांकडून तपासणी केली असता, गंभीर आजाराचे निदान झाले आणि हेच वारंवार दुर्लक्षिले गेलेले दुखणे आयुष्याची चिंता भेडसावणारे ठरले.

**डोकेदुखी :** अगदी कोवळ्या वयाची मुले आपले डोके दुखते म्हणून अगदी डोके धरून बसतात. यावेळी लहान मुलांना चष्मा लागणे स्वाभाविक आहे म्हणून त्यांना चष्मा असावा असा अंदाज करून डोकेदुखीच्या आजाराकडे बरेचदा दुर्लक्ष केले जाते. शालेय जीवनात अशा तक्रारी वारंवार उद्भवताना दिसून येतात. चक्कर येणे, डोके दुखणे अशा आजाराकडे दुर्लक्ष करण्यापेक्षा लहान मुलांची काळजी घेणे आवश्यक आहे.

# एटीएसकडून १२ जण ताब्यात...
## ठाण्यात दहशतवाद प्रकरणात मोठी कारवाई




■**ठाणे** : महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकाने सोमवारी सकाळपासून ठाणे जिल्ह्यातील पडघा येथे दहशतवादाशी संबंधित प्रकरणात मोठी कारवाई करत १२ जणांना ताब्यात घेतले. ही कारवाई सकाळी ४ वाजल्यापासून सुरू करण्यात आली होती. या कारवाईत SIMI (स्टुडंट्स इस्लामिक मूव्हमेंट ऑफ इंडिया) संघटनेचे काही माजी पदाधिकारी आणि सदस्यांच्या घरांवर झडती घेण्यात आली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

झडतीदरम्यान अळर ने दोन डझनांहून अधिक घरांवर आणि बंदी घालण्यात आलेल्या रक्क्टक संघटनेच्या माजी सदस्यांच्या ठिकाणांवर धाड टाकली. यामध्ये साकिब नाचन, आकिब साकिब नाचन, अब्दुल लतीफ कासकर, कैफ नाचन आणि शाजिल नाचन यांच्या घरांचा समावेश होता. फरक जुबेर मुल्ला या जमीन दलालाच्या घराचीही झडती घेण्यात आली. तो SIMIचा माजी सदस्य असून त्याने अलीकडे सौदी अरेबियात हज यात्रा केली होती. त्याचा मोठा भाऊ हसीब जुबेर मुल्ला मुंबईतील २००२ आणि २००३ च्या लोकल बॉम्बस्फोट प्रकरणात दोषी ठरला होता आणि १० वर्षांची शिक्षा भोगल्यानंतर सध्या दिल्लीतील तुरुंगात साकिब नाचनसोबत क्रक्र मॉड्यूल प्रकरणात बंदिस्त आहे.

अब्दुल लतीफ कासकर हा एका गोदामात काम करत असून, तो दिल्लीतील क्रक्र प्रकरणात ताब्यात घेतलेल्या फरहान सुसेंचा निकटवर्तीय मित्र आहे, असेही अधिकाऱ्यांनी सांगितले.

या कारवाईदरम्यान सहा संशयित त्यांच्या घरी अनुपस्थित होते. ही शोधमोहीम दुपारपर्यंत सुरू होती आणि ताब्यात घेतलेल्या संशयितांची चौकशी अनेक तास चालली. नंतर १२ जणांना पुढील तपासासाठी पदघा पोलीस ठाण्यात नेण्यात आले. आम्ही काही व्यक्तींची ओळख पटवली असून, त्यानुसार झडती सुरू आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

२०२३ मध्येही राष्ट्रीय तपास संस्थेने पदघा येथे क्रक्र विरोधात मोठी मोहीम राबवत साकिब नाचनसह अनेकांना अटक केली होती.

### दहशतवादाशी संबंधित प्रकरणात कारवाई

ठाणे जिल्ह्यातील पडघा गावात दहशतवादाशी संबंधित गंभीर प्रकरणात महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकने मोठी कारवाई केली आहे. ठाणे ग्रामीण पोलिसांच्या सहकार्याने ही धाड टाकण्यात आली असून ही कारवाई दहशतवादी कारवायांच्या संशयासंदर्भात सुरू असलेल्या तपासाचा एक भाग आहे. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, एटीएसने पडघा गावातील विविध ठिकाणी जवळपास 250 पोलसांचे पथक शोधमोहीमेसाठी धाडले आहे. विशेष म्हणजे, या कारवाईदरम्यान एटीएसने स्टुडंट्स इस्लामिक मूव्हमेंट ऑफ इंडिया (रक्टक)या बंदी घालण्यात आलेल्या संघटनेचा माजी पदाधिकारी साकिब नाचन याच्या राहत्या घरी देखील छापा टाकला. साकिब नचन याला यापूर्वी दोन स्वतंत्र दहशतवादी प्रकरणांत अटक झाली असून त्याचा दहशतवादाशी संबंध असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. साकिब नाचन हे नाव याआधीही अनेक वेळा कट्टर विचारसरणीच्या आणि दहशतवादाशी संबंधित तपासांमध्ये पुढे आले आहे. त्याचे अनेक संशयितांशी संबंध असल्याचे सुरुवातीच्या चौकशीत समोर आले आहे. त्यामुळे एटीएसने या कारवाईदरम्यान साकिब नाचन याच्या घराची झडती घेऊन काही महत्त्वाचे दस्तऐवज, डिजिटल उपकरणे आणि अन्य पुरावे जप्त केले असल्याचे सांगितले जात आहे. याआधीही नॅशनल इन्व्हेस्टिगेशन एजन्सीने पडघा परिसरात मोठ्या प्रमाणावर छापेमारी केली होती. त्या कारवाईतही अनेक संशयितांना अटक करण्यात आली होती आणि दहशतवादी कनेक्शन उघडकीस आले होते. त्यामुळे हा परिसर सुरक्षा यंत्रणांच्या रडारवर होता. सध्या एटीएसची ही मोहीम सुरू असून अजून अधिकृत माहिती दिलेली नाही. या कारवाईतून आणखी धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### मुदत संपलेल्या वस्तूंची विक्री पडली महागात
# घाटकोपर येथील कंपनीविरोधात गुन्हा दाखल



■**मुंबई** : एक्सपायरी अथवा एक्सपायरी तारीख जवळ आलेला माल डी मार्टमधून खरेदी करत तो पुन्हा रिपॅकिंग करत बाजारात विक्री केला जात असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. गृहराज्य मंत्री योगेश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न व औषध प्रशासन विभागाने घाटकोपर येथील खुशी ट्रेडिंग कंपनीत छापा टाकला असता तपासणीत हा प्रकार समोर आला आहे. त्यानंतर कंपनीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


अन्न व औषध प्रशासन राज्यमंत्री योगेश कदम यांच्या कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे व संयुक्त आयुक्त (अन्न) मंगेश माने यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न व औषध प्रशासन, ग्रेटर मुंबई झोन - ८ यांनी २२ मे २०२५ रोजी घाटकोपर (पश्चिम) कोजमांजिंजी इस्टेट येथील एम एस खुशी ट्रेडिंग गाळा क्र. बी १९, बी २१ व बी २२ येथे छापा टाकला.

यावेळी तपासणीदरम्यान आस्थापनाकडे अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरणाचा वैध परवाना नसल्याचे आढळून आले. ते अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ मधील कलम ३१(१) चे स्पष्ट उल्लंघन आहे. उत्पादनाची व वितरणाची परिस्थिती अत्यंत अस्वच्छ होती. खुशी ट्रेडिंग कंपनी डी मार्टकडून एक्सपायर व एक्सपायरी जवळ आलेला माल मोठ्या प्रमाणावर खरेदी करत तोच माल पुन्हा रिपॅकिंग करून नव्याने बाजारात विक्रीसाठी आणत होती, असा प्रकार समोर आला.

२२ मे २०२५ रोजी अन्न सुरक्षा अधिकारी अभिनंदन रांदिवे यांनी खुशी ट्रेडिंगला अन्न व्यवसाय थांबविण्याचा आदेश दिला. मात्र २९ मे रोजी सहाय्यक आयुक्त (अन्न) अनुपमा पाटील व अन्न सुरक्षा अधिकारी रांदिवे यांनी घेतलेल्या अनपेक्षित पुनःतपासणीत, आस्थापनाने परस्पर व्यवसाय पुन्हा सुरू केल्याचे आढळून आले. खुशी ट्रेडिंग कंपनीविरोधात पुढील कायदेशीर कलमान्वये घाटकोपर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

एफडीए पथकाने नवी मुंबई व भिवंडी येथील डी मार्टच्या शाखांवर ३० मे रोजी छापे टाकले. कारवाईदरम्यान डी मार्ट त्यांच्या स्टोअर्समधील एक्सपायर व एक्सपायरीजवळ आलेला माल खुशी ट्रेडिंगसारख्या आस्थापनांना विकत असल्याचे स्पष्ट झाले.

## शहापूर एक्झिट ते नाशिक महामार्ग खड्डेमय



■**शहापूर** : नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गाच्या अखेरच्या टप्प्याचा लोकार्पण सोहळा इगतपुरी येथे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ५ जून रोजी होतं असतानाच या समृद्धी महामार्गाची शहापूर एक्झिट असलेला खुटघर ते शहापूर येथील मुंबई-नाशिक जुना महामार्ग पर्यंतचा रस्ता पूर्णतः खड्ड्यात गेला आहे. या ३ किमी अंतरात असलेले भातसा नदी व आवरे नदीवरील पूल कुमकुमवत असल्याने महाड येथील सावत्री नदीसारखी दुर्घटना घडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी नागपूर-मुंबई समृद्धी महामार्ग निमार्णाकरिता असतानाच महामार्गाचे एक्झिट असलेले रस्ते देखील आपल्या ताब्यात घेऊन तेथील रस्ते व पूल चांगल्या दर्जाचे करण्याचे योजले होते. त्यामुळे शहापूर ते मुरबाड असलेला रस्ता महामंडळाने आपल्या ताब्यात घेऊन हा रस्ता सिमेंटचा करण्यास ७ वर्षांपूर्वी सुरू केले होते. मात्र ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे आतापर्यंत हा रस्ता पूर्णत्वास गेलेला नाही. समृद्धीची शहापूर एक्झिट असलेला खुटघर-दौऱ्याचा पाडा येथून शहापूरकडे येणार सिमेंटचा रस्ता जागोजागी अपुरा ठेवण्यात आलेला आहे, तर सापगांव येथील भातसा नदीवरील ब्रिटिशकालीन पूल हा अखेरच्या घटका मोजत असून नदीवरील दोन्ही बाजूला संरक्षक कठडे नाहीत. पावसाळ्यात अनेक वेळा या मुंबईला पाणीपुरवठा करणारे भातसा धरण ओसंडून वाहू लागल्यानंतर भातसा नदीवरील ब्रिज पाण्याखाली गेल्याने शहापूरशी संपर्क तुटत असतो. याच रस्त्यावर शहापूरकडे येत असताना कांबारे पावर हाऊसजवळ असलेल्या आवरी नदीवरील पूल देखील असाच धोकादायक असून पाऊसकाळ्यात यावर देखील पाणी असल्याने अनेक वेळा वाहतूक बंद झालेली आहे.

### आता जुगार, मटकेवाल्याची खैर नाही
# रायगड पोलीस प्रमुख आंचल दलाल कडाडल्या



■**पनवेल** : रायगड जिल्ह्याला प्रथमच महिला पोलीस प्रमुख लाभल्या आहेत. पदभार स्वीकारल्यानंतर आणि आठ दिवस आढावा घेतल्यानंतर नव्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी मटका, जुगार तसेच बेकायदा धंद्येवाल्यांची खैर नाही, असा थेट इशारा दिला आहे. सोमवारी (२ जून) त्यांनी पहिल्यांदा पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी कारवाईची दिशा स्पष्ट केली. त्याचवेळी महिलांच्या सुरक्षेला संपूर्ण प्राधान्य असेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

रायगड जिल्ह्यात विशेष करून रायगड जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या अलिबागमध्ये जुगार, मटक्याचे धंदे बेधडक सुरू असल्याचे माध्यमांनी यापूर्वी अनेकदा निदर्शनास आणले आहे. त्यावेळी त्यावर कारवाई व्हायची. त्यानंतर पुन्हा जैसे सुरू व्हायचे. मात्र, आता तात्पुरती नाही तर कायमची कारवाई होणार, असे स्पष्ट करून पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी रायगड जिल्ह्यातील जुगार, मटका, गुटखा यांना लक्ष्य करणार असल्याचे स्पष्ट संकेत दिले आहे. एवढेच नाही तर तीन ते चार दिवसांपूर्वी त्यांनी रायगड जिल्ह्यातील बेकायदा धंदे बंद करण्याचे आदेश पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांना दिले आहेत.

**डिझेल तस्करी संपवणार**

डिझेल तस्करीसाठी रायगडची किनारपट्टी बदनाम होत आहे. म्हणूनच डिझेल तस्करी रोखण्यासाठी जिल्ह्यातील आठ सागरी पोलीस ठाण्यांच्या माध्यमातून सागरी सुरक्षा अधिक कडक करण्यासाठी विविध उपाययोजना केल्या जाणार आहेत. शिवाय तटरक्षक दलाची मदत घेतली जाईल, असेही आंचल दलाल सांगितले. आंचल दलाल यांनी २२ मे रोजी रायगडच्या पोलीस अधीक्षकपदाची जबाबदारी घेतल्यानंतर लगेचच कामाला सुरुवात केली आहे. महिलांची छेडछाड रोखण्यासाठी दामिनी पथकाला बळ देणार असल्याचे त्यांनी सांगितले. १५ जूनपासून शाळा-कॉलेज सुरू होतील. त्यावेळी छेडछाडीच्या घटना घडू नयेत म्हणून दामिनी पथके पुन्हा जोरात कामाला लागतील, याकडे त्यांनी लक्ष वेधले. जिल्ह्यातील महामार्ग वाहतूक कोंडीचे हब बनले आहेत. मुंबई-गोवा महामार्गावर माणगाव, कोलाडजवळ कायम वाहतूक कोंडी होते. जिल्ह्यातील महामार्गावरील वाहतूक कोंडी निकाली काढण्यावर भर देत असल्याचेही आंचल दलाल यांनी सांगितले.

### शिवराज्याभिषेक दिनासाठी सुरक्षा

दरम्यान, ६ जून रोजी किल्ले रायगडावर तारखेनुसार शिवराज्याभिषेक दिन सोहळा साजरा केला जाणार आहे. या सोहळ्यासाठी ३ लाखांहून अधिक शिवप्रेमी रायगडावर येणार आहेत. सध्या रायगड पोलीस त्यांच्या सुरक्षेसाठी संपूर्ण तयार आहे. यावेळी दीड हजाराहून अधिक पोलीस अधिकारी, कर्मचारी सज्ज असतील, असे पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी सांगितले. रायगडावर येणाऱ्या शिवप्रेमींना कुठलाही त्रास होऊ नये म्हणून या मार्गावर वाहतूक पोलीस सज्ज असतील. पार्किंगची व्यवस्था केली जात आहे तसेच वाहतूक कोंडीची झळ बसू नये यासाठी रायगड पोलिसांची तयारी केली आहे. याशिवाय सीआरपीएफ, शीघ्र कृती दल आणि सुरक्षेत त्रुटी राहू नये म्हणून लगतच्या जिल्ह्यातून पोलिसांची मदत घेतली जाणार असल्याचे आंचल दलाल यांनी सांगितले.

## आंदोलनानंतर उपसचिवांचे आश्वासन



■**ठाणे** : दिव्यांगांना आत्मनिर्भर करण्याच्या उद्देशाने ई-वाहने देण्याच्या ठरावाची अंमलबजावणी केली जात आहे. मात्र, ही वाहने देताना शहरी की ग्रामीण भागात चालवावित याबाबत करार नसतानाही आता शहरी भागात वाहने चालवू नयेत, अशी अट घातली जात आहे. शिवाय, ही वाहने कामचलाऊ स्वरूपाची देऊन ठेकेदाराने स्वतःच्या तुंबड्या भरण्यास सुरुवात केली आहे. याबाबत अनेकवेळा पत्रव्यवहार करूनही कारवाई होत नसल्याने आता अखिल भारतीय दिव्यांग सेनेचे मुख्य संयोजक मोहम्मद युसूफ मोहम्मद फारुक खान यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलकांची भेट घेऊन संबधित कंपनीवर कारवाई करण्याचा आश्वासन दिव्यांग मंत्रालयाचे उपसचिव बोडके यांनी दिले.

दिव्यांगांना स्वबळावर काम करता यावे तसेच आर्थिकदृष्ट्या दिव्यांग सक्षम व्हावे, यासाठी हरित ऊर्जेवर चालणाऱ्या व्यावसायिक वाहने देण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. त्याची अंमलबजावणी १२ डिसेंबर २०२३ नंतर सुरू करण्याचे आदेश स्वयंप्रेरणेने मानवी हक्क आयोगाने दिले होते. त्यानंतर ऑनलाइन पद्धतीने अर्ज मागवून बेरोजगार दिव्यांगांना पर्यावरणस्नेही वाहने प्रदान करण्यात आली.

ही वाहने पुरविण्याचे कंत्राट मेसर्स मॅक ऑटो इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला देण्यात आले. त्यासाठी २४ कोटी ८७ लाख रुपयांची निविदा देण्यात आली होती. या कंपनीने निकृष्ट दर्जाच्या गाड्या दिव्यांगांना दिल्या. याची चौकशी सुरू असल्याचे सांगून दिव्यांगांची बोळवण करण्यात आली. त्या विरोधात हे आंदोलन करण्यात आले होते.

### सेल्फीचा मोह १९ वर्षीय तरुणाच्या जीवावर बेतला!
# मुंबईतील समुद्रकिनाऱ्यावरील थरार कॅमेरात कैद



शनिवारी सायंकाळी पाच वाजल्यापासून खवळलेला समुद्र पाहण्यासाठी आलेल्या एका प्रत्यक्षदर्शीने संपूर्ण घटनाक्रम सांगितला. "पाणी 'खूपच खवळलेले' होते आणि जेट्टीजवळील खडकांवर 'जोरजोरात आदळत' होते. संबंधित निरीक्षकाने वारंवार दिलेल्या आवाजाच्या इशाऱ्यांकडे दुर्लक्ष करून चार तरुणांसह अनेक लोक जेट्टीच्या काठावर जाताना दिसले. मी त्यांना जेट्टीच्या निसरड्या बाजूजवळ जाऊ नका असे अनेक वेळा ओरडले, पण त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केलं," असे प्रत्यक्षदर्शीने सांगितले.

■**धुळे** : मुंबईतील जुहूच्या समुद्र किनाऱ्यावर बुडून एका तरुणाचा मृत्यू झाला आहे. शनिवारी संध्याकाळी ५ वाजून ४५ मिनिटादरम्यान हा तरुण मित्रांसह जुहू बिचावर भटकंतीसाठी गेला होता. मित्राबरोबर तो फोटो काढत असताना त्याचा तोल गेला आणि तो पाण्यात पडला. पोहता येत नसल्याने तो बुडू लागला त्याने आणि सोबत असलेल्या मित्रांनी आरडाओरडा करायला सुरुवात केली. ही गोष्ट त्या ठिकाणी असलेल्या जीवरक्षक लक्षात आले. त्यांनी त्या युवकाचा जीव वाचवण्यासाठी समुद्रात उडी घेतली आणि पोहत त्याच्याकडे आणि त्याला बाहेर काढले पण त्याच्या नाकातोंडात पाणी गेल्याने त्याचा मृत्यू झाला होता.

**भरती-ओहोटीमुळे समुद्रात ओढला गेला**

जुहू कोळीवाडा येथील जेट्टीवर ही दुर्दैवी घटना घडली. वारंवार इशारा देऊनही हा १९ वर्षीय तरुण सेल्फी काढण्याच्या नादात समुद्रात बुडाला. मयत तरुणाचं नाव अनिल अर्जुन राजपूत असं आहे. शक्तिशाली लाटा आणि उथळ भरती-ओहोटीमुळे अनिल समुद्रात वाहून गेला.

**तो फोटो ठरला जीवघेणा**

संध्याकाळी साडेपाचच्या सुमारास, एका तरुण दगडाभोवती लाटा आदळत असताना दोन्ही हात वर करून एका दगडावर धोकादायक पोज देताना दिसला. काही क्षणातच, एक जोरदार लाट आली आणि तो पाण्यात फेकला गेला. हा परिसर त्याच्या धोकादायक पाण्याच्या प्रवाहासाठी आणि मोठ्या खडकांसाठी कुप्रसिद्ध असून लाटांचा विचार केल्यास या ठिकाणी बचाव कार्य अत्यंत कठीण होऊन बसतं आणि हेच या ठिकाणी झाल्याचं प्रत्यक्षदर्शी म्हणाला.

**मदतीसाठी कॉल केला पण...**

प्रत्यक्षदर्शीने स्थानिक व्हॉट्सअप ग्रुपवर आपत्कालीन सेवा (१०० क्रमांकावर) दोनदा कॉल केला आणि नंतर संकटसमयी पाठवतात तो संदेश पाठवला. अग्निशमन दलाचे सदस्य जुहू कोळीवाडा येथील विशाल गावडे यांनी हा संदेश पाहिला आणि जुहू बीचवर तैनात असलेल्या जीवरक्षकांना तातडीने सूचना दिल्या. पगली लेन प्रवेशद्वारावरून दोन जीवरक्षक पाठवण्यात आले आणि संध्याकाळी ५.४९ वाजता हे जीवरक्षक घटनास्थळी पोहोचले.

**स्थानिकाने वाचवण्याचा प्रयत्न केला पण...**

जीवरक्षक येण्यापूर्वी पोहता येणाऱ्या एका धाडसी स्थानिक व्यक्तीने अनिलला वाचवण्याच्या प्रयत्नात पाण्यात उडी मारली. मात्र आधीच घाबरलेल्या आणि पाणी नाका-तोंडात गेलेल्या अनिलने बचाव करण्यासाठी आलेल्या व्यक्तीला घट्ट चिकटून राहिल्याने दोघांनाही सुरक्षितपणे बाहेर पडता आलं नाही.

**अनिलचा मृत्यू**

जोरदार प्रवाहामुळे आणि फ्लोटेशन उपकरणाच्या अभावामुळे बचावकर्त्यांर्ला काहीही करता आलं नाही. तो अनिलला "हाथ पेअर मारो, हाथ पेअर मारो" (हात आणि पाय हलवा) असे ओरडताना ऐकू आला, परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही आणि अनिलचा मृत्यू झाला.

### कुठे कार पुलावरून कोसळली, तर कुठे चालकाला डुलकी लागली
# महाराष्ट्र हादरला! विविध अपघातात ११ ठार...



■**मुंबई | प्रतिनिधी** : महाराष्ट्र आज विविध अपघातांनी हादरला आहे. राज्यात विविध ठिकाणी झालेल्या अपघातात ११ लोक ठार झाले आहेत. तर ४ जण जखमी झाले आहेत. अकोला, बीड, सोलापूर, जालना आणि भंडारा आदी ठिकाणी हे अपघात झाले. एका ठिकाणी कार पुलावरून कोसळल्याने कारमधील प्रवाशांना जीव गमवावा लागला तर एका ठिकाणी चालकाला डुलकी लागल्याने प्रवाशांचा मृत्यू झाला आहे. या घटनांचे पंचनामे करण्यात आले असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

**अकोल्यात तिघे दगावले**

अकोला जिल्हात मध्यरात्रीच्या सुमारास चारचाकी वाहनाचा भीषण अपघात झाला. हा अपघात अत्यंत भीषण होता. अकोला जिल्ह्यातील वाडेगाव बाळापूर रस्त्यावर हा अपघात झाला. रात्रीचा अंधार असल्याने चालकाला अंदाज आला नाही. त्यामुळे कार थेट नदीवरील पुलाचे कठडे तोडत पुलाखाली कोसळली. त्यामुळे अपघातात तीन जणांचा मृत्यू झाला आहे. तर एकजण गंभीर जखमी आहे. कन्हैय्यासिंग ठाकूर (वय ५४), विशाल भानुदास सोलनकर (वय ४५) आणि सुनील शर्मा (वय ४५) असं मृत्यूमुखी पडलेल्यांची नावे आहेत. आशिष कन्हैय्यासिंग ठाकूर हा गंभीर जखमी आहे. त्याच्यावर अकोल्याच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अपघातात मरण पावलेले सर्वजण बाळापूरचे राहणारे आहेत. हा अपघात अत्यंत भीषण असल्याचं सांगितलं जात आहे. पुलाचे कठडे तोडून कार थेट खाली कोसळली. खाली कोसळल्यानंतरही कार ५-६ वेळा पलटी झाली. त्यामुले कारमधील प्रवाशांच्या डोक्याला जबर मार लागल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाल्याचं सूत्रांनी सांगितलं. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून बाळापूर शहर पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

**बीडमध्ये चारजण ठार**

बीड जिल्ह्यात अत्यंत भीषण अपघात झाला. एका भरधाव टेम्पोने रिक्षाला जोरदार धडक दिल्याने अपघातात चौघांचा मृत्यू झाला असून दोनजण गंभीर जखमी झाले आहेत. माजलगाव तालुक्यातील नित्रूड परिसरात तेलगाव-माजलगाव रस्त्यावर रात्री ११.३० वाजता हा भीषण अपघात झाला. आयशर टेम्पोने रिक्षाला धडक देऊन ५० ते ६० फुटांपर्यंत फरफटत नेले. त्यामुळे चौघांचा जागीच मृत्यू झाला. मृतांमध्ये सिरसाळा येथील फारूक चाँद सय्यद, शबाना फारूक, शेख नोहिद एजाज आणि फैजान रफिक सय्यद यांचा समावेश आहे. आयशर टेम्पो चालक घटनास्थळावरून पसार झाला. दिंद्रुड पोलिसांनी रात्रीच घटनास्थळी धाव घेऊन पुढील कार्यवाही सुरू केली.

**भंडाऱ्यात दोघांनी जीव गमावला**

भंडाऱ्याच्या राष्ट्रीय महामार्ग क्र. ५३ वर देवरीकडुन साकोलीकडे जात असलेल्या दुचाकीला भरधाव टाटा मॅजिक वाहनाच्या चालकाने धडक दिली. या अपघातात मोटारसायलस्वारासह दोघांचा जागीच मृत्यू झाला. भंडारा जिल्ह्याच्या साकोली तालुक्यातील उकारा फाट्यावर ही घटना घडली. जितेंद्र रविंद्र उपराळे (वय २८ वर्षे, राहाणार मोहनटोला, ता. आमगाव, जि. गोंदिया) आणि यादोराव गोपाल वघारे (वय ३६, रा.आमगाव,जि. गोंदिया) या दोघांचा या अपघातात मृत्यू झाला आहे.

**ड्रायव्हरला डुलकी लागली, एकाचा मृत्यू**

जालना येथे सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गावर वडीगोद्री परिसरात कार आणि ट्रकचा भीषण अपघात झालाय. या अपघातात एकाचा जागीच मृत्यू तर दुसरा एक जण गंभीर जखमी झाला आहे. कार चालकाला डूलकी लागल्याने कार दुभाजक ओलांडून थेट विरुद्ध साईटला असणाऱ्या ट्रकवर जाऊन आदळली. हैदराबादकडून शिर्डीकडे देवदर्शनासाठी ही कार जात होती. त्यावेळी हा अपघात झाला. हा अपघात इतका भीषण होता की, कार भरधाव वेगात ट्रकला जाऊन धडकताच कारचा अक्षरशः चक्काचूर झाला.

**सोलापुरात चिमुकल्याचा मृत्यू**

सोलापुरात दुचाकीने धडक दिल्याने एका चिमुकल्याचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. आजीसोबत चालत जात असताना दुचाकीने धडक दिल्याने या ६ वर्षीय चिमुकल्याचा मृत्यू झाला. शिवांशू ऊर्फ बंटू लक्ष्मीनारायण बोद्धल असे मृत चिमुकल्याचे नाव आहे. ३१ मे रोजी दुपारी सोलापुरातल्या गेंट्याल चौक ते शास्त्री नगर रस्त्यावर हा अपघात झाला. जखमी अपघातानंतर शिवांशूला रुग्णालयात दाखल करण्यात आलं. त्याच्यावर उपचार सुरू होते. पण रात्री त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी एका अज्ञात महिला दुचाकी चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आलाय.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com